शनिवार, ४ फेब्रुवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१६३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SATURDAY 4 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-163 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# तळमळीतूनच साहित्य-राजकीय नेतृत्वाची निर्मिती

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : ९६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रमोद पाणबुडे**

**वर्धा : जगण्याचे बळ देणारे साहित्यिक हे मुळात सामाजिक नेते असतात.जगण्याच्या तळमळीतून साहित्य आणि राजकीय नेतृत्व निर्माण होते. समाजाला दिशा देणाऱ्या या दोन्हींचे उगमस्थान साहित्यच आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्रातील दिग्गजांच्या मार्गदर्शनाचा व सूचनांचा राज्यशासन कायम आदर करीत आल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ९६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.**

विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त येथील आचार्य विनोबा भावे सभामंडपात प्राचार्य राम शेवाळकर व्यासपीठावर आयोजित या संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री शिंदे यांच्याहस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. संमेलनाध्यक्ष न्या.नरेंद्र चपळगावकर, शालेय शिक्षण तथा मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, पूर्वाध्यक्ष भारत सासणे, स्वागताध्यक्ष माजी खासदार दत्ता मेघे, साहित्य अकादमीचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ. विश्वनाथप्रसाद तिवारी, प्रसिद्ध हिंदी कवी डॉ. कुमार विश्वास आणि डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष प्रदीप दाते आदि उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, वर्धा ही राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या वास्तव्याने पावन झालेली भूमी आहे. हे दोन्ही महान नेते एक उत्तम लेखक होते. या प्रभावळीत लोकमान्य टिळक, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, अटलबिहारी वाजपेयी, यशवंतराव चव्हाण, प्रबोधनकार ठाकरे, बाळासाहेब ठाकरे आदी राजकीय नेते हे उत्तम लेखक होते. लोकसेवेचे व्रत घेवून या सर्व नेत्यांनी साहित्यातूनच आपल्या सामाजिक व राजकीय कार्याची मोट बांधल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. राजकीय नेतृत्वाचे उगमस्थान साहित्य असल्याचे यातून अधोरेखित होते, त्यामुळे लोकसेवेच्या व्रताला बळ देण्यासाठी साहित्यिकांकडून राज्यकर्त्यांना मार्गदर्शन व्हावे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. मराठी साहित्य संमेलन हे सुदृढ सांस्कृतिक लोकशाहीचे विशाल रूप मराठी भाषा ही चमत्कार घडविणारी आहे. संत साहित्य आणि साहित्याच्या विविध प्रवाहांनी या भाषेला समृद्ध केले आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी भाषेचा उत्सव साजरा होतो. हे संमेलन म्हणजे सुदृढ सांस्कृतिक लोकशाहीचे विशाल रूप असल्याचे गौरवोद्गारही श्री शिंदे यांनी काढले. मराठी भाषा संमेलनाची शतकाकडे होत असलेली वाटचाल ही गौरवाची बाब आहे. लक्षावधी सारस्वत या संमेलनासाठी महाराष्ट्र व देशातून दरवर्षी एकत्र येतात ही ओढ अद्भूत आहे. मराठी भाषा मंत्री,दीपक केसरकर यांनीही यावेळी संबोधित केले. ते म्हणाले,साहित्यिक हे समाजाची ज्योत आहे, ही ज्योत तेवत ठेवण्यासाठी राज्य शासन सदैव पाठिशी आहे. मराठी साहित्याच्या विकासासाठी राज्य शासनाची प्रतिबद्धता असल्याचे सांगत त्यांनी साहित्य क्षेत्रात राज्य शासन हस्तक्षेप करणार नाही.

सातारा जिल्ह्यातील वाई येथे मराठी विश्वकोष भवन आणि मुंबईत मराठी भाषा भवन बांधण्यात येत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी देण्यात येणारे अनुदान ५० लाखाहून वाढवून २ कोटी करण्यात आले. तसेच, विश्व साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठीचे अनुदान १० कोटींहून वाढवून १५ कोटी केल्याचेही त्यांनी सांगितले.



### संमेलनाध्यक्षांना राज्य अतिथीचा दर्जा

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांना राज्य अतिथींचा ( स्टेट गेस्ट ) दर्जा देण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री श्री . शिंदे यांनी केली . मराठी साहित्य मंडळाने राज्य शासनाकडे या संदर्भात मागणी केली होती, ती मागणी मान्य करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले .

### वर्ध्यातील ' लाईट, साऊंड ॲन्ड लेझर शो ' ची मागणी मान्य

वर्धा येथील साहित्य संमेलनात शहराच्या स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाला मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केले . आमदार डॉ . पंकज भोयर यांनी सेवाग्राम मार्गावरील चरखा भवन येथे महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या मोठ्या प्रतिमा लावलेल्या ठिकाणी ' लाईट, साऊंड अँड लेझर शो ' राज्य शासना मार्फत सुरु करण्यात यावा, अशी मागणी केली होती . मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात वर्ध्याच्या वैभवात भर घालण्यासाठी सौदर्यीकरणाची ही मागणी मान्य करण्यात येत असल्याचे जाहीर केले .

महत्वाची बातमी

## बच्चू कडूंचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** विधानपरिषदेच्या निकालाचा विधानसभा अथवा लोकसभा निवडणुकीवर कोणताही परिणाम होत नसतो, मात्र मंत्रिमंडळ विस्तार न केल्यास त्याच फटका शिंदे-फडणवीस सरकारला बसू शकतो असा घरचा आहेर प्रहार संघटनेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिला. ते पंढरपुरात बोलत होते. शिक्षक आणि पदवीधर जागांच्या झालेल्या निवडणुकीत दोन लाखांच्या आसपास मतदान असल्याने याचा कोणताही परिणाम विधानसभा अथवा लोकसभेच्या निकालावर होत नसतो. पण हे जरी खरं असलं तरी तरी राज्यात मंत्रिमंडळ विस्तार न झाल्याने कामे खोळंबू लागली आहेत. त्यामुळे जनतेत नाराजी आहे, आणि याचा फटका सरकारला बसू शकतो असा इशारा आमदार बच्चू कडू यांनी दिला. या विधानपरिषद निवडणुकीत जुन्या पेन्शनचा मुद्दा समोर आल्याने असे निकाल लागले. हे मतदार संघटित असल्याने त्यांचा निकाल आणि ताकद दाखवू शकले. मात्र यांच्या कित्येक पटीने जास्त असणाऱ्या असंघटित शेतकरी, शेतमजूर , कामगार वर्गाचे प्रश्न यापेक्षा गंभीर आहेत.

## अदाणीवरून संसदेत गदारोळ

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज आजही गदारोळामुळे ठप्प झाले. संसदेत अदाणी प्रकरणावरून मोठा गदारोळ सुरू झाला. यानंतर दोन्हीही सभागृहांमधील कामकाज दोन वाजेपर्यंत स्थगितकरण्यात आले. राज्यसभेचे कामकाज दुपारी अडीच वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले आहे, तर लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले आहे.

काँग्रेसह विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे आज लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर काही मिनिटांमध्येच ते दोन वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. तसेच, राज्यसभेचे कामकाजही दुपारी अडीच वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. सभागृहाचे कामकाज सुरू होण्याअगोदर काँग्रेस आणि १५ अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांची बैठक झाली. ज्यामध्ये अदाणी समूहाविरोधात Hindenburg Research द्वारे अदाणींवर करण्यात आलेल्या आरोपांबाबत चर्चा झाली आणि याप्रकरणी चौकशीची मागणीचा मुद्दा दोन्ही सभागृहात उपस्थित करण्यावर जोर देण्यात आला. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या संसद भवनातील कक्षात झालेल्या बैठकीत काँग्रेस, द्रमुक, आम आदमी पार्टी, भार राष्ट्र समिती, समाजवादी पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, जनता दल (यूनाइटेड) आणि अनेक विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले होते. गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या अदाणी उद्योग समूहाचा उलट्या दिशेने सुरू असलेला प्रवास अजूनही थांबण्याची कोणतीही चिन्हं दिसत नाहीयेत. Hindenburg Research नं अदाणी उद्योग समूहावर बाजारातील व्यवहारांमध्ये गैरव्यवहार केल्याचा ठपका ठेवल्यानंतर अदाणी उद्योग समूहाची पत ढासळतानाच दिसत आहे.

चर्चेतली बातमी

## पाकच्या ड्रोनची भारतीय हद्दीत घुसखोरी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** अनेकदा शस्त्रसंधी आणि चर्चांच्या फेऱ्या होऊनही पाकिस्तानकडून अजूनही सीमाभागात आगळीक चालूच असते. आज एक पाकिस्तानी ड्रोन भारतीय हद्दीत घुसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बीएसएफ अर्थात सीमा सुरशक्षा दलाच्या जवानांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे हे ड्रोन वेळीच खाली पाडण्यात यश आले आहे. यासंदर्भात पीटीआयने ट्वीट करून माहिती दिली आहे. शुक्रवारी पहाटे २.३० च्या सुमारास अमृतसरमध्ये रेअर कक्कर भागात हे ड्रोन दिसून आले. बीएसएफच्या जवानांना हे ड्रोन दिसताच त्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला. ड्रोन कोसळल्यानंतर सकाळच्या सुमारास ते शोधून काढण्यात बीएसएफला यश आले. सीमारेषेवरील भारताच्या बाजूचे तारेचे कुंपण आणि झिरो लाईनच्या मध्ये हे ड्रोन पडलेले होते. यामध्ये काही संशयित वस्तू आढळल्याची माहिती बीएसएफकडून देण्यात आली असून त्याची तपासणी केली जात आहे.


# बोगस आदिवासींची घुसखोरी थांबवा

## आदिवासी एकता परिषद व आदिवासी टायगर सेनेची धरणे आंदोलनातून मागणी

आधुनिक केसरी न्यूज

धुळे : राज्यातील बोगस आदिवासींचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढत असल्याने खऱ्या आदिवासींवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत आहे. त्यामुळे सरकारने योग्य ती कार्यवाही तातडीने करावी आणि आदिवासी बांधवांना न्याय मिळवून द्यावा, अशा आग्रही मागणीबाबत आदिवासी एकता परिषद व आदिवासी टायगर सेनेच्या वतीने शिंदखेडा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे. बोगस आदिवासींवर तत्काळ कारवाई करून त्यांचे सेवा समाप्त करून खऱ्या आदिवासींना सेवेत शासनाने सामावून घ्यावे अशा मागणीचे निवेदन ही तहसील प्रशासनाला देण्यात आले आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयांच्या अवमान करुन बोगस आदिवासीना संरक्षण देण्याचे काम राज्य सरकाने केला असल्याचा आरोपही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. बोगस आदिवासींनी खऱ्या आदिवासींच्या नोकऱ्या बळकवल्या आहेत त्यामुळे न्याय हक्कांपासून खरे आदीवासी वंचित असल्याचे दिसून येत आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची पायमल्ली करणाऱ्या राज्य सरकारचा निषेध व्यक्त करत बोगस आदिवासी हटाव म्हणून आदिवासी एकता परिषद व आदिवासी टायगर सेनेच्या वतीने शिंदखेडा तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे. या आंदोलनात संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

शिकवणं किंवा शिकणं हे कसं असतं ते सांगताना प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर त्यांच्या शिक्षकांचं उदाहरण दिलं होतं . त्यांची शाळा साधी मराठी माध्यमाची होती. पण त्यांना जे विज्ञानाचे शिक्षक, भूगोलाचे शिक्षक मिळाले होते, त्या शिक्षकांनी त्यांना केवळ वर्गाच्या चार भिंतीत शिकवलं नाही. भूगोलाचे शिक्षक त्यांना पर्यावरण, समुद्र इ शिकवताना सहलीला म्हणून बाहेर घेऊन जात. तेथे पर्यावरणाच्या, समुद्राच्या निरीक्षणातून त्यांचे शिक्षण घडत होते.

भूगोल शिकता शिकता पक्षी जगत, वनस्पती इ बद्दल सुद्धा शिकायला मिळत असे. खरा शिक्षक तोच असतो जो विषयांची एकमेकात सांगड घालतो. मी फक्त भूगोलाचा शिक्षक आहे असे म्हणून त्याला चालणार नाही. त्यांचे विज्ञानाचे शिक्षक त्यांना साबण बनवण्याची प्रक्रिया समजावून देताना साबणाच्या कारखान्यात घेऊन गेले. तिथे मुलांनी ती सगळी प्रक्रिया आपल्या डोळ्यांनी अनुभवली. बहिर्गोल भिंगातून प्रकाशकिरण एकत्र केले की त्यांची शक्ती वाढते. ते एकवटले की कागद सुद्धा जाळू शकतात. हे त्यांच्या शिक्षकांनी त्यांना वर्गाच्या बाहेर नेऊन सांगितले. मुलांना तो प्रयोग करून दाखवला. त्यांनाही अनुभव घ्यायला लावला. दुसऱ्या एखाद्या शिक्षकाने या गोष्टी वर्गातही शिकवल्या असत्या. पण मग ती झाली असती केवळ माहिती. मुलांनी घेतला तो प्रत्यक्ष अनुभव. आणि जे ज्ञान अनुभवातून येते, ते जणू वज्रलेप होते. मग परीक्षेची भीती बाळगण्याची गरज नसते. शिकणं ही प्रक्रिया आहे. कोणतीही प्रक्रिया म्हटलं की त्याला अनुसरून काही गोष्टी येतातच. तसं शिकणं ही प्रक्रिया जेव्हा घडते तेव्हा जो शिकतो आहे त्याला काही तरी अनुभव देणं किंवा त्याला स्वतःला काही अनुभव येणं, त्यामधून त्याला जी काही जाणीव प्राप्त होते, ती म्हणजे ज्ञान किंवा शिकण्याची प्रक्रिया म्हणता येईल. खरं तर शिकणं म्हणजे अनुभवातून शहाणं होत जाणं. हे अनुभवांती शिकणं वेगळं आणि शाळा कॉलेजात जाऊन जे आपण शिकतो ते वेगळं. **क्रमशः**



## आनंदी पहाट

## श्वास आणि विश्वास दोन्हीही महत्त्वाचेच

आधुनिक केसरी

आपल्याला आयुष्य जगण्यासाठी जसा श्वास गरजेचा असतो, तसाच आपल्या आयुष्यात जगण्यापलीकडचे जीवन जगण्यासाठी विश्वास महत्वाचा असतो. आपल्या जीवनांत आपल्याला लाभलेले जाज्वल्य हे फक्त श्वास- विश्वासावरच अवलंबून, टिकून रहात असते. श्वसन प्रकाराच्या उपयोगातून आपले जगणे अधिक सुलभ, सुरक्षित आणि सुंदर करणे आपल्यावरच अवलंबून असते. जितका मोठा श्वास घेतला जातो तितकेच आयुष्य मोठे, दीर्घ होत जाते. ह्या श्वासावर नियंत्रण करण्याचे शास्त्र आपण अवगत केले, कि समजायचे, आपण आपल्या जगण्यावर विजय मिळवला. खरे तर अगदी सहज आणि नकळत घेतलेल्या श्वासाचे किती महत्व असते, हे समजून घेण्याची जाणीव होणे जरुरीचे असते. नकळत केलेल्या अनेक गोष्टी आपल्याकडून अनेकदा दुर्लक्षित रहात असतात. श्वास आणि विश्वासाचे देखील तसेच असते. श्वास-विश्वासाच्या बाबतीत खरेच आपण नेहमीच गाफील रहात असतो, हीच खरी उणिव म्हणावी लागेल. अनेकदा आपल्या बाबतीत जसे श्वासाचे, तसेच विश्वासाचे सुद्धा असते. आपण अगदी सहजपणे केवळ दृश्य पण आभासी जगावर आंधळेपणाने विश्वास टाकत असतो. आपल्या डोळ्यांवर चढलेली विश्वासाची झापडे आपल्याला भ्रमांत अडकवतात. आपल्याला अगदी नुकत्याच भेटलेल्या व्यक्तीबरोबर, एखाद्या योजनेसाठी, जाहिरातींना भुलून जाऊन आपले सर्वस्व सुद्धा अर्पण करायला तयार होतो. अगदी काही क्षणांत, काही काळांत आपण त्यांवर विश्वास ठेवतो आणि व्यवहार करून मोकळे होते. पण हे मोकळे होणे आपला खिसा, तिजोरी देखील मोकळे करत आहे ह्याची जाणीवही होत नाही. आपण म्हणतो, कि आपण माणसे ओळखायला चुकत नाहीत म्हणून; परंतू त्याच माणसांचे मन ओळखू शकत नाहीत, हीच शोकांतिका ठरते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**तोच सदाचार | विठु ठायी ||**
**अंगी बाणा थोडा | सात्विक विचार ||**
**योग्य तो आचार | सज्जनांचा ||१||**
**परोपकार तो | स्वधर्म जाणावा ||**
**आपुला मानावा | निंदक ही ||२||**
**दया क्षमा अंगी | रूजवावी जरा ||**
**मायेचा अंगारा | भाळी शोभे ||३||**
**चंदनाच्या संगे | चंदनचि व्हावे ||**
**दुर्गंधा जाळावे | विकारांच्या ||४||**
**श्वासात पेरावा | संतांचा विचार ||**
**तोच सदाचार | आचरावा ||५||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

**स्पष्ट, सूचक, हळूवार, आवेशपूर्ण, अर्धोक्ति, अन्योक्ति इ. बोलण्याचे अनेक प्रकार आहेत. यातील प्रत्येक प्रकाराचे उपयोजन स्थल-काल-स्थितीनुसार करा. मात्र काही प्रसंगात मौनाइतका बोलण्याचा कोणताच सुरेख प्रकार नसतो हे ध्यानी ठेवा.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**एखाद्याकडे आपले आज काम आहे म्हणून त्याला मधुर बोलण्यापेक्षा नेहमीच मधुर बोला. तुमचे शब्द ऐकणे हा सुखद अनुभव असला पाहिजे.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**धर्म कर्म संसार में, सो सब मन कर रुप ।**
**जन्म मरण दुख सुख सभी, जीव परे भवकूप ।।२५।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/२५**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
जगात जेवढे धर्म, कर्मकांड आहेत, ते सर्व मनाचेच स्वरूप आहे. यांच्या द्वारेच जीव या भवसागरात पुन्हा पुन्हा येऊन जन्म-मरण तसेच समस्त सुख-दुःखाला प्राप्त करीत आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

सहाव्या समासातील माध्यान्य भागात आपणपोहचलो आहोत. मी मागे म्हणालेच आहे की वरचेवर खुपच विचार पूर्वक लिखाण अपेक्षित आहे त्यामुळे वाचकांच्या हाती देतान ऊशीर होत आहे आणि याची मला जाणीव आहे पण ऊत्तम ते द्यावे ऊत्तम ते घ्यावे हा विचार मनात कायमचा घर करून असल्याने लिखाणात मर्यादा येत आहेत. सर्व प्रथम मी दिलगिरी व्यक्त करते. वेद वाङःमयाचा अभ्यास करत असताना अभ्यासकाने ब्रम्हा, विष्णू, महेश, दत्तात्रेय हेच फक्त थोर आणि ज्ञानी पुरूष होऊन गेले असे म्हणणे म्हणजे पढतमूर्ख पणा आहे. आणि यावर आपण एक समास पूर्णपणे अभ्यासला आहे. (पढतमूर्खाची लक्षणे) वेद, उपनिषदांमध्ये भागवत ग्रंथात ऊल्लेखलेला शुक आणि वामदेव यांचा देखील मुक्त व ज्ञानी असा ऊल्लेख आढळतो. हे दोघेही ब्रम्हज्ञानी होते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## परमेश्वर जाणण्याचा मार्ग !

आधुनिक केसरी

जो कोणी एखादे कृत्य करतो त्यात तो करणारा असतो; स्वतः निराळा राहूनही त्या कृत्यात तो अंशरूपाने असतो. न्यायाधीश निकाल देतो तेव्हा 'अमक्या न्यायाधिशाने निकाल दिला' असे म्हणतो. म्हणजेच काय की, तो न्यायाधीश जरी वेगळा असला तरी दिलेल्या निकालामध्ये तो असतोच. त्याचप्रमाणे परमात्म्याने हे जे सर्व जग उत्पन्न केले, त्या प्रत्येकात तो अंशरूपाने आहे. म्हणूनच, सर्व चराचरामध्ये ईश्वर पाहावा असे सांगतात त्याचेही कारण हेच आहे. या सर्व चराचर सृष्टीमध्ये ईश्वर पाहायला आपली तितकी प्रबळ इच्छा व्हावी लागते. देव आहे ही पुष्कळांची नुसती भावनाच असते, पण ती बरोबर जाणली जात नाही, आणि ती बरोबर जाणण्याची इच्छा होणे हेच खरे व्हायला पाहिजे असे असते, अशी ज्याला इच्छा झाली त्याचे अर्धे काम झाले असे म्हणावे. तशी इच्छा झाल्यावर, देव पाहण्यासाठी काय मार्ग आहेत हे तो पाहू लागतो. त्याला पुष्कळ निरनिराळे मार्ग सांगणारे भेटतील. कोणी सांगतील की संन्यास घेतला म्हणजे ताबडतोब ईश्वराची प्राप्ती होईल; कुणी सांगतील की ब्रह्मचारी राहिले म्हणजे देव भेटेल, कुणी सांगतील गृहस्थाश्रम वेदाने श्रेष्ठ सांगितला आहे. तसे वागले म्हणजे देव आपल्या घरी चालत येईल; कुणी याग, कुणी हठयोग, तर कुणी



जपतपादि साधने सांगतील. अशा मतामतांच्या गोंधळात आपण काय करावे ? तर ज्यांनी तो मार्ग चोखाळला आहे, त्यांनी काय केले ते पाहावे. असा मार्ग कुणी चोखाळला ? तर जे संत लोक आजपर्यंत झाले त्यांनी. त्या सर्वांनी देवाची प्राप्ती करून घेतली आहे. म्हणून ते काय सांगतात ते पाहावे.

आपण घराच्या बाहेर जायला निघालो म्हणजे वाट चालू लागतो. जिथे चार वाटा फुटतात तिथे पाट्या लावलेल्या असतात, आणि जिकडे जायचे ते त्यावर लिहिलेले असते. समजा आपल्याला पंढरपूर जायचे आहे; आता केवळ एखादा रस्ता सावलीचा आहे म्हणून त्याच रस्त्याने जाऊ लागलो तर आपण पंढरपूरला पोहोचू का ? पंढरपूरचा मार्ग उन्हाचा म्हणून आपण तो सोडून देऊन सावलीच्या रस्त्याने जावे, तसेच आपले झाले आहे. आपण विषयात आनंद मानून त्यातच रंगून गेलो आहोत, आणि त्यामुळे देवाकडे जाणारा रस्ता चुकलो आहोत. म्हणूनच, संत सांगत असतात त्या वाटेनेच जाण्याचा निश्चय करावा, आणि तो मार्ग जरी कठीण वाटत असला, तरी तो देवाकडे जातो हे लक्षात ठेवावे. **आजचे बोधवचन आहे - संतांनी जो मार्ग आखला त्यावर डोळे मिटून जावे; पडण्याची, अडखळण्याची भितीच नाही.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**तुका म्हणे तुम्ही भयाभीत नारी । कैसे संग सरी तुम्हां आम्हां ॥३॥**
**परपुरुषाचें सुख भोगे तरी । उतरोनि करीं घ्यावें सीस ॥१॥**
**संवसारा आगी आपुलेनि हातें । लावूनि मागुतें पाहूं नये ॥२॥**
**तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग हा नीट दीपासोई ॥३॥**
**अइकाल परी ऐसें नव्हे बाई । न संडा या सोई भ्रताराची ॥१॥**
**नव्हे आराणुक लौकिकापासून । आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥**
**तुका म्हणे मन कराल कठीण । त्या या निवडोन मजपाशीं ॥३॥**
**आहांच वाहांच आंत वरी दोन्ही । न लगा गडणी आम्हां तैशा ॥१॥**
**भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा । आवरूनि मना बंद द्यावा ॥२॥**
**तुका म्हणे कांहीं अभ्यासावांचुनी । नव्हे हे करणी भलतीची ॥३॥**
**बहुतांच्या आम्ही न मिळो मतासी । कोणी कैसी कैसी भावनेच्या ॥१॥**

# कर्मकांडाला फाटा देत केले आईचे देहदान

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कृष्णा चांदगुडे यांचा समाजापुढे आदर्श

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** 'मरावे परी किर्तीरूपी उरावे' अशी आपल्याकडे म्हण आहे. मात्र 'मरावे परी अवयवरुपी उरावे' ही काळाची गरज ओळखून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी मातोश्रींच्या मृत्यूपश्चात धार्मिक विधी, कर्मकांड न करता देहदान करून समाजापुढे आदर्श उभा केला आहे.



काल दि.२ फेब्रुवारी रात्री सुगंधाबाई त्र्यंबक चांदगुडे यांचे दुःखद निधन झाले. मातोश्रींच्या इच्छेनुसार त्यांच्या निधनानंतर कुठलाही धार्मिक विधी, कर्मकांड न करता त्यांचा मृतदेह नाशिक येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाला सुपूर्द करण्यात आला. कृष्णा चांदगुडे हे पुरोगामी विचारांचे असून त्यांना मातोश्रींकडूनच बाळकडू मिळाले आहे. महाराष्ट्र शासनाने विधवा प्रथा निर्मूलनाचे परीपत्रक काढल्यानंतर महाराष्ट्रात प्रथमच सुगंधाबाई यांनी विधवा असूनही त्याची अंमलबजावणी करत टिकली, मंगळसूत्र, जोडवे परिधान केले होते. सुगंधाबाई यांच्या दशक्रिया विधी ऐवजी दि.१२ फेब्रुवारी चासनळी ता.कोपरगाव येथे आदरांजली सभा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी अवयवदान चळवळीचे कार्यकर्ते सुनील देशपांडे, उपाध्यक्ष, फेडरेशन ऑफ ऑर्गन ॲन्ड बॉडी डोनेशन, मुंबई यांचे 'देहदान व अवयवदान काळाची गरज' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या प्रसंगी मरणोत्तर देहदानाची इच्छा असणाऱ्या व्यक्तींचे फॉर्म भरून घेणार असल्याचे कृष्णा चांदगुडे यांनी सांगितले.

> मी अंधश्रद्धा निर्मूलनचे काम करत असतांना 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे आईच्या इच्छेनुसार देहदान केला आहे. यासाठी मला बहिणी रत्ना, पूनम व भाऊ दिगंबर यांची साथ मिळाली आहे. धार्मिक विधीचा खर्च टाळून शाळेला आर्थिक मदत करण्यात येणार आहे.
> **कृष्णाजी चांदगुडे,** राज्य कार्यवाह, अंधश्रद्धा निर्मूलन व जातपंचायत मूठमाती अभियान



# आझादनगर पोलिसांची दमदार कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आझाद नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोऱ्या करणाऱ्या तिघा चोट्यांचा शोध घेऊन कारवाई करण्यात आली आहे.तर तिघांपैकी दोन चोरटे अल्पवयीन असल्याची माहिती समोर आली आहे. दिनांक 31 जानेवारी 2023 रोजी धुळे शहरातील भोला बाजार या ठिकाणी अमीन उस्मान शेख, व जावेद सलीम खाटीक यांच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यानी हात सफाई केली होती. अमिन उस्मान शेख यांच्या घरातून 23 हजार 700 रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला होता तर जावेद सलीम खाटीक यांच्या बंद घरातून 8 हजार 50 रुपयांचे पितळे भांडे, मोबाईल आणि भिशीचे पैसे लांबवले होते. याप्रकरणी आझाद नगर पोलिसांनी केलेल्या तपासात सराईत गुन्हेगार सोयल मजीद मन्सुरी वय 19 रा. शिवाजीनगर आणि अल्पवयीन हर्षद शहा अकबर शहा वय 16 वर्षे रा शिवाजीनगर धुळे यांनी गुन्हा केल्यावरून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर त्यांनी गुन्ह्याची कबुली देत 6950 रुपये किमतीचे तांबे पितळ ॲल्युमिनियमचे भांडे व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल व 10 हजार रुपये किमतीचे दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

तसेच वडजाई रोडवरील जुम्मन गफारशहा हे 29 जानेवारी रोजी नमाज पठण करण्यासाठी गेले असता त्यांची मश्जिद समोर लावलेली 20 हजार किमतीची मोटर सायकल चोरी झाली होती ही चोरी वय 16 वर्ष अल्पवयीन रिहान खान फरीद खान पठाण याने केल्याचं तपासात आढळले. सदर मोटरसायकल ही जप्त करण्यात आली आहे तर तिसरी चोरी उघडकीस आणत सराईत आरोपीने बेवारस सोडून दिलेली मोटरसायकल हस्तगत केली आहे. अशाप्रकारे चोरी व घरफोडी गुन्ह्यातील 56 हजार 950 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती सहाय्यक पोलिस अधीक्षक ऋषिकेश रेड्डी यांनी प्रसार माध्यमांसमोर बोलताना दिली दिली आहे.

# चार कि.मी. फरपटत गेली दुचाकी

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** हरयाणाच्या गुरुग्राममध्ये रस्त्यावरून भरधाव जाणाऱ्या कारने दुचाकील जोरदार धडक दिली. हा अपघाता इतका भीषण होता की, कारने धडक दिलेली दुचाकी चार किमीर्यंत फरफटत गेली. गुरुग्रामच्या सेक्टर ६२ मध्ये ही घटना घडली. कारने दुचाकीला धडक दिल्यानंतर दुचाकी कारच्या ग्रीलला अडकली. भरधाव वेगाने जाणाऱ्या कारमुळे रस्त्यावर आगीच्या ठिणग्या पडत होग्या. वाहनांच्या बर्निंगचा हा धक्कादायक व्हिडीओ कॅमेरात कैद झाला असून व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. दरम्यान, दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या दोन जणांचा जीव थोडक्यात वाचला, अशी माहिती समोर आली आहे. दुचाकीवरून प्रवास करत असताना पाठीमागून येणाऱ्या एका कारने धडक दिली. कारने जोरात धडक दिल्याने आम्ही दोघेही दुचाकीवरून खाली पडलो. अपघात इतका भीषण होता की, दुचाकी चार किमीपर्यंत फरफटत गेली. कारच्या पुढे असलेल्या ग्रीलला दुचाकी अडकल्याने रस्त्यावरुन भरधाव वेगाने जात असताना आगीच्या ठिणग्या उडत होत्या. कामवरुन घरी जात असताना हा अपघात झाला. कार चालक ड्रिंक अँड ड्राईव्ह करत होता.



दुचाकी कारला अडकल्यानंतरही त्याने कारला रस्त्यावर थांबवले नाही. आम्ही कारचालकाना जोरजोरात ओरडून थांबवण्याचा प्रयत्न केला. पण त्याने दुर्लक्ष केले आणि भरधाव वेगाने कार चालवतच राहिला. हा अपघात झाल्यानंतर आम्हाला गंभीर दुखापत झाली नाही. आम्ही अपघाताचा व्हिडीओ कॅमेरात कैद केला, अशी माहिती दुचाकीस्वारांनी कार चालकाविरोधात तक्रार दाखल करताना पोलिसांना दिली. आम्ही फरिदाबादमध्ये राहणाऱ्या आरोपी सुशांत मेहताला अटक केलीय. आरोपीची कार जप्त करण्यात आली आहे. सेक्टर ६३ मध्ये एका खाजगी कंपनीत आरोपी सुशांत नोकरी करतो, अशी माहिती पोलिसांनी दिलीय.

# भाजप प्रदेश प्रवक्तेपदी राम कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** भाजपाने प्रदेश प्रवक्ता विस्तारित यादी जाहिर केली असुन त्यात पत्रकार राम कुलकर्णी यांची पुन्हा प्रदेश प्रवक्ता म्हणुन नियुक्ती करण्यात आली. मागच्या तीन वर्षापासुन प्रवक्तेपदी काम करताना संघटनात्मक कार्य आणि पक्षाची बाजु माध्यमाकडे मांडण्यात नेहमीच अग्रेसर राहिले. त्यांच्या पुनर्नियुक्तीमुळे बीड जिल्ह्यात आनंद व्यक्त होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. 2019 साली प्रदेश प्रवक्ता म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. तीन वर्षे प्रसारमाध्यमात त्यांनी केलेले लिखाण इलेक्ट्रॉनिक मिडियासमोर मांडलेली बाजू एवढेच नव्हे तर विरोधकांवर तुटुन पडणारा, स्पष्ट वक्ता, परखड बोलणारा प्रवक्ता अशी त्यांची ओळख होवुन बसली. प्रदेश संघटनात्मक बदल झाल्यानंतर काही दिवसापुर्वी प्रवक्ता पुनर्रचना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. त्यात विस्तारित प्रवक्ता यादी काल पुन्हा जाहिर करण्यात आली असून कुलकर्णी यांना प्रदेश प्रवक्ते म्हणुन पुन्हा घोषित करण्यात आल्याचे पत्र प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी काढले. प्रवक्तेपदी



नांव घोषित होताच भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे, जिल्ह्याच्या खा.डॉ.प्रितमताई मुंडे, माजी आ.आर. टी.देशमुख, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्यासह जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, महिला आघाडीच्या अध्यक्षा उषाताई मुंडे, ठाकूर उदयसिंह दिख्खत, महादेवराव दहिफळे, बालासाहेब गित्ते, अशोक जैन, रमाकांत बापु मुंडे, अनंतराव भोसले, महेश शेप, ठाकुर सुजितसिंह दिख्खत, बिपीनदादा क्षीरसागर, ॲड.मकरंद पत्की, सौ.वर्षाताई मुंडे, अमरनाथ खुर्पे, सोमनाथ बडे, जगदिश गोरे, प्रा.बिभीषण फड, पत्रकार दत्तात्रय आंबेकर, भास्कर खडके, जेष्ठ पत्रकार उमेश मोगरेकर, हिंदुलाल काकडे, शिवाजीराव गित्ते, मयुर कुलकर्णी, राहुल कुलकर्णी, बाळु यादव, ज्ञानेश्वर माऊली किर्दंत, ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार यांच्यासह मित्र परिवारांनी अभिनंदन केले. दरम्यान प्रवक्तापदी पक्ष नेतृत्वाने मला पुन्हा एकदा संधी देवून जो विश्वास टाकला तो आपल्या कामातून सेवाभाव वृत्तीने पुढे जाताना सार्थ करून दाखवू, मा.प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मा.उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, मा.पंकजाताई मुंडे, मा.आ.श्रीकांतजी भारतीय, खा.डॉ.प्रितमताई मुंडे, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, संघटनमंत्री संजयभाऊ कौडगे यांच्यासह अनेकांचे कुलकर्णी यांनी आभार व्यक्त केले.




# मराठा उमेदवारांना धक्का

आधुनिक केसरी

'सरकारी नोकर भरतीत मराठा उमेदवारांना पूर्वी मराठा आरक्षण कायद्यांतर्गत जागा राखीव करून संधी दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्या कायद्याला स्थगिती दिली आणि नंतर तो कायदा रद्द केला म्हणून त्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या मध्यातच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या (ईडब्ल्यूएस) आरक्षणाची संधी पूर्वलक्ष्यी प्रभावाने खुली करण्याचा राज्य सरकारचा निर्णय बेकायदा आहे', असा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) गुरुवारी दिला. मात्र, त्याचवेळी 'भविष्यातील सरकारी नोकर भरतींमध्ये मराठा समाजातील पात्र उमेदवारांना राज्यघटनेच्या अनुच्छेद १४, १६(४) व १६(६) अन्वये असलेल्या तरतुदींप्रमाणे ईडब्ल्यूएसचे आरक्षण खुले असायलाच हवे', असेही 'मॅट'च्या अध्यक्ष न्या. मृदुला भाटकर व सदस्य मेधा गाडगीळ यांच्या खंडपीठाने आपल्या ६० पानी निर्णयात स्पष्ट केले. सार्वजनिक बांधकाम विभागातील १११ पदे, वन विभागातील दहा पदे व राज्य कर विभागातील १३ पदे अशा एकूण १३४ पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) सन २०१९मध्ये जाहिराती देऊन निवड प्रक्रिया केली होती. त्यात मराठा उमेदवारांनी मराठा आरक्षणाखाली अर्ज केले होते, तर ईडब्ल्यूएस आरक्षणासाठी पात्र उमेदवारांनी त्याअंतर्गत अर्ज केले होते. 'या भरती प्रक्रियेत लेखी परीक्षा व मुलाखती होऊन निवड प्रक्रिया पूर्ण झालेली असतानाही मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबर २०२० रोजी स्थगिती दिल्यामुळे राज्य सरकारने मराठा उमेदवारांना २३ डिसेंबर २०२०च्या जीआरद्वारे पूर्वलक्ष्यी प्रभावाने ईडब्ल्यूएस आरक्षणांतर्गत संधी खुली केली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण कायदा ५ मे २०२१ रोजी रद्दबातल ठरवले असतानाही राज्य सरकारने ३१ मे २०२१च्या जीआरद्वारे मराठा उमेदवारांना ईडब्ल्यूएसचा पर्याय घेण्याची मुभा दिली. हे दोन्ही निर्णय बेकायदा व मनमानी आहेत', असा दावा करत 'ईडब्ल्यूएस' गटातील अनेक उमेदवारांनी अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते, सबिहा अन्सारी, सय्यद तौसिफ यासीन यांच्यामार्फत आक्षेप घेतला होता. 'यापूर्वी महावितरणच्या भरती प्रक्रियेत मुंबई उच्च न्यायालयाने याच मुद्द्यावरील याचिकांवर निर्णय देताना राज्य सरकारचा निर्णय मनमानी व बेकायदा असून ईडब्ल्यूएस आरक्षणाने आधीच हक्क निर्माण झालेल्या ईडब्ल्यूएस गटातील उमेदवारांचे नुकसान करणारा असल्याचा निर्णय दिला आहे. त्याविरोधातील अपीलही सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले आहे', असेही 'मॅट'च्या खंडपीठाने आपल्या निर्णयात स्पष्ट केले. तसेच 'सरकारचा २३ डिसेंबर २०२०चा जीआर हा आपल्याच १२ फेब्रुवारी २०१९ व २८ जुलै २०२० या दोन्ही तारखांच्या जीआरशी विसंगत आहे. निवड प्रक्रियेत अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होऊन ती नावे एमपीएससीने सरकारला कळवली असताना अचानक मध्येच मराठा उमेदवारांना ईडब्ल्यूएस आरक्षणाची संधी खुली केल्याने गुणवत्ता यादीत आधी निवड झालेले उमेदवार मागे पडले. आता त्या ईडब्ल्यूएस उमेदवारांना सुपरन्युमररी पदे देऊ करण्याचा सरकारचा निर्णयही बेकायदा आहे. सुपरन्युमररी पदे द्यायचीच असतील तर ती मराठा आरक्षण गटातून ईडब्ल्यूएस गटात आलेल्यांना द्यायला हवी. त्यामुळे मूळ गुणवत्ता यादीप्रमाणेच ईडब्ल्यूएस उमेदवारांच्या नावांच्या शिफारशीचा सरकारने विचार करावा. ईडब्ल्यूएस उमेदवारांच्या मूळ गुणवत्ता यादीप्रमाणेच अंतिम निवड यादी तयार करून एमपीएससीने चार आठवड्यांच्या आत सरकारला शिफारस करावी.

# कृषी प्रदर्शन आणि सर्वसामान्य शेतकरी



सुशील गायकवाड
संपर्क क्र. : 9309474068

आधुनिक केसरी

**शेतकरी राजा जगला पाहिजे म्हणून शेतकऱ्यांच्या प्रति प्रचंड कळवळा आपल्याला पाहायला मिळत असतो.आजही शेतकऱ्यांच्या परिषदा, शेतकऱ्यांचे संमेलन, शेतकऱ्यांसाठी मोर्चे आंदोलन केली जात आहेत. परंतु या परिषदा, संमलने व मोर्चांनासुद्धा शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रूंना थांबविता आलेले नाही. तात्पुरता दिलासा मिळत असतो. परंतु शेतकऱ्यांची दुखणी कायमस्वरूपी मिटतच नाहीत.ना इथला सर्वसामान्य शेतकरी सुधारला ना इथल्या शेतकऱ्याची विकासाची दारे खुली झाली. शेतीतून विविध पिके घेणारा, खेड्या पासून ते शहरातील गल्ली पर्यंत स्वतःचा माल विक्रीस घेऊन जाणारा शेतकरी प्रत्येकाला जगवत आहे.**

परंतु हाच तो सर्वसामान्य शेतकरी मात्र चांगले जीवन जगण्यापासून वंचितच राहिलेला आहे.तोटा सहन करून शेतात आजही राब राबतोय...त्याच शेतात कुणी आलेच तर त्यास भाजी पाल्याची पिशवी भरून देणारा शेतकरी राजाच आहे. कोथिंबीरीची पेंडी पारखून कमी भावाने मागणाऱ्या ग्राहकाला सुध्दा अगदी दिलदार मनाने त्याच दरात तो पेंडी देत असतो.परंतु शेतकऱ्यांच्या समस्या सुटण्यास आजही त्यांच्या पदरी निराशाच निराशा दिसून येत आहे.

आजही तेच रडगाणे आणि आज ही तीच अवस्था शेतकऱ्यांच्या बाबतीत झालेली आहे. महाराष्ट्रच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आत्महत्या ही न थांबणारि प्रक्रिया कुठे ना कुठे घडतच आहे.त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत यासाठी आजही सरकारला कोणत्याही विशेष उपाययोजना करता आलेल्या नाहीत.तात्पुरती मलमपट्टी लावण्याच्या प्रकाराने पुढची आत्महत्या थांबविण्यास ही मलमपट्टी उपयुक्त ठरतेचे असे सुद्धा नाही.शेतकऱ्यांनी आत्महत्या केली की एखादी रक्कम घोषित करून कुटुंबीयांना मदत करण्याचे प्रयत्न होत असतात. घरातील कर्ता आत्महत्या करतो.अर्धवट संसार सोडून जातो तेव्हा त्या घरावर दुःखाचा डोंगर कोसळतो.

शेतकऱ्याने आत्महत्या केल्याने शेतकऱ्यांची कर्जमाफी तर होतच आहे.यातून तात्पुरता स्वरूपाचा प्रश्न सुटत ही आहे. परंतु ही कर्जमाफी करून शेतकऱ्यांची अवस्था बदलणार नाही. शेतकऱ्यांच्या शेती विकासासाठी काही तरी करावेच लागणार आहे. शेतकऱ्यास आणि शेतकऱ्यांच्या शेतीला सुधारण्यासाठी नव नवीन तंत्रज्ञान माहीत होत असताना त्यास त्या तंत्रज्ञाना सोबत मदतीचा हात सुद्धा जाणे गरजेचे आहे.हल्ली नव नवीन शेतीविषयक तंत्रज्ञाना बाबत ओळख होण्यासाठी कृषी प्रदर्शन हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने विशेष मार्गदर्शक असेच समजले जाते. त्यासाठी नियोजन बद्ध कृषी प्रदर्शनाचे मोठं मोठाले प्रदर्शन भरविले जात असतात.परंतु यातून सर्वसामान्य शेतकऱ्यास व त्या शेतकऱ्याने किती प्रमाणात फायदा करून घेतला वा होतो की नाही किंवा त्यास यातून खरच नवी दिशा मिळत असते का ? हे कृषी प्रदर्शन सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने उपयुक्त असतेच का ? यांसारखे अनेक सवाल कृषी प्रदर्शनाबाबत उपस्थित झालेले असतात.कृषी प्रदर्शन हे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे हित जपणारे असायला हवे.परंतु या कृषी प्रदर्शनात नक्की कुणाचे प्रदर्शन होत असते ? आणि कुणाचे हित जपले जात असते ? कृषी प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी किती कसरत करावी लागत असते ?

**हे कृषी प्रदर्शन कुणासाठी उपलब्ध होत असते ?**

हे सर्वांना ज्ञात असतेच असते. शेतकऱ्यांच्या कृषी विषयक विकासा बाबत किती प्रमाणात ठोस पाऊले पडली जात असतात ? याचे खरे वास्तव सर्वांनाच माहीत असते.मुळातच कृषी प्रदर्शन हे कृषीशी संबंधित असते.परंतु अशी अनेक कृषी प्रदर्शन पाहायला मिळत असतात की अशा ह्या कृषी प्रदर्शनाचा आणि शेतकऱ्यांच्या शेतीशी काडीमात्र संबंध येत नसतो. आलाच तर यात हे कृषी प्रदर्शन सर्वसामान्य शेतकऱ्याच्या हिताचे नसतेच नसते.कृषी प्रदर्शन हे प्रगतशील झालेल्यांची आणि शेतीशी संबंधित असलेल्या विविध कंपन्यांची जाहिरात करून जात असते.हा नफा ज्या त्या कंपन्यांना होत असतो. कृषी प्रदर्शनाची एक सोपी व्याख्या सांगायची म्हटली तर जे शेतीतून मोठे झालेले असतात.जी कंपनी शेती क्षेत्रातून उदयास आलेली असते.अशांनाच अजून मोठे करण्याचा प्रयोगच म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.यात सर्वसामान्य शेतकऱ्याने फक्त यायचं,माहीती घ्यायची,परत पुढच्या वर्षीच्या कृषी प्रदर्शनात दाखल व्हायचे.एखादा प्रयोग शील शेतकरी प्रयोग करण्याचा प्रयत्न करत असेलही.परंतु हे कृषी प्रदर्शन सर्वसामान्य शेतकऱ्यांचे कधीच होत नसते.कृषी प्रदर्शन हे सर्वसामान्य शेतकऱ्यांना कधीच उपयुक्त ठरणारे नसते.प्रगतशील शेतकरी अधिक प्रगत होत जातील. परंतु सर्वसामान्य शेतकऱ्यास आयुष्य भर संघर्ष करत जगावे लागत असते.आत्महत्या करणारा शेतकरी वर्ग हा सर्वसामान्य शेतकरीच असतो.सर्वसामान्य शेतकऱ्यास जिथे स्वतःच्या शेतीतून उत्पन्न घेताना मोठी कसरत करावी लागत असते.अशा शेतकऱ्यास कृषी प्रदर्शन कसे काय उपयुक्त ठरणार ना ? सर्वसामान्य शेतकऱ्याचे प्रश्न त्यांच्या अडीअडचणी सोडविणारे कृषी प्रदर्शन फक्त आणि फक्त त्यांच्या साठीच भरणे अपेक्षित आहे. ज्याचे भांडवल जास्त आहे.ज्याची ऐपत आहे.अशीच लोकं या कृषी प्रदर्शनाचा घटक बनत असतात. ही भांडवलशाही असून धनाची श्रीमंती असलेल्या ठिकाणी सर्वसामान्य शेतकरी कसा टिकेल ? सर्वसामान्य शेतकरी आणि त्यांच्या साठीच कृषी प्रदर्शनात सन्मानाची जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.शेती पिकविणारा हा सर्वसामान्य शेतकरी जोपर्यंत समृद्ध केला जात नाही तोपर्यंत अशी किती ही कृषी प्रदर्शने भरली तरी त्या कृषी प्रदर्शनाचा फक्त एक दिखावाच राहील शिवाय जे आर्थिकतेचे ध्येय ठेवलेले असतेच.त्या पुरतेच हे कार्य पार पडेल.शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी व त्यांना विशेष मदतीचा हात देण्यासाठी कृषी प्रदर्शनातून किमया घडायला हवी.कृषी प्रदर्शनातून सर्वसामान्य शेतकऱ्यांचा सन्मान झाला पाहिजे.कृषी प्रदर्शनाने नुसता देखावा आणि दिखाव्याची भूमिका स्वीकारली नाही पाहिजे तर सर्वसामान्य शेतकऱ्याला सुद्धा विकासाची संधी मिळवून देण्यासाठी त्यांचं आर्थिक स्तर उंचावणारे हे कृषी प्रदर्शन दिसायला हवे. सर्वसामान्य शेतकऱ्यांचा विचार होत असताना इथे सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतीच्या विकासासाठी दारे खुली झाली पाहिजेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांना नव तंत्रज्ञान उपलब्ध झालं तरी त्या शेतकऱ्या प्रति किती उपयुक्त ठरते.हे तंत्रज्ञान अवगत होण्या इतपत तरी हा सर्वसामान्य शेतकरी विकसित होत असतो का ? शेतकऱ्यांना त्याच्या पिकाला योग्य तो भाव मिळावा.म्हणून शेतकऱ्याची नेहमी तळमळ पाहायला मिळत असते.परंतु शेतकऱ्यास योग्य तो मोबदला मिळत नसल्याने यासाठी कृषी प्रदर्शनातून विचार मंथन व्हायला हवे.कृषी प्रदर्शनातून शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांना सोडविनारे कृतिशील कार्य घडले पाहिजे.कृषी प्रदर्शन आणि सर्वसामान्य शेतकरी अशी ओळख उदयास यायला हवी.तरच ही भरत असलेली कृषी प्रदर्शने सार्थकी लागतील.



# घोषणांचा नुसता पाऊस

आधुनिक केसरी

**२०१४ साली सत्तेवर आलेल्या मोदी सरकारचा दहावा आणि लोकसभा निवडणुकीपूर्वीचा शेवटचा नियमित अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारीला संसदेत सादर केला. पुढील वर्षी म्हणजे २०२४ च्या एप्रिल मे महिन्यात लोकसभा निवडणुका होतील त्यामुळे पुढील वर्षी अर्थमंत्र्यांना अंतरिम अर्थसंकल्प सादर करावा लागेल त्यामुळेच मोदी सरकारचा हा शेवटचा नियमित अर्थसंकल्प असल्याने या अर्थसंकल्पाकडे सर्व क्षेत्राचे लक्ष लागले होते. अर्थात निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच अर्थमंत्र्यांनी सर्व वर्गांना विशेषतः मध्यम वर्गांना खुश करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.**

अर्थमंत्र्यांनी केवळ पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीचाच नव्हे तर यावर्षी होणाऱ्या ९ राज्यातील विधानसभा निवडणूकाही डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्प सादर केला आहे त्यामुळेच कदाचित कर्नाटकला सरकारने भरभरून दिले आहे. केंद्राने कर्नाटकला भद्रा अप्पर प्रकल्पासाठी ५ हजार ३०० कोटी रुपयांचे आर्थिक साहाय्य केले आहे. या प्रकल्पामुळे कर्नाटकातील दुष्काळी भागातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकते. एकीकडे निवडणूक असलेल्या राज्यांच्या पारड्यात भरभरून पडत असताना ज्या महाराष्ट्रातून केंद्राला सर्वाधिक महसूल मिळतो त्या महाराष्ट्राच्या हाती काय लागले हे पाहायला गेलो तर महाराष्ट्राच्या हाती निराशाच लाभली असे म्हणावे लागेल कारण अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्रासाठी कोणतीच ठोस घोषणा केली नाही. मात्र देशाचा विचार करण्यात आलेल्या घोषणांमध्ये महाराष्ट्राचा वाटा असणार आहे असे दिसते. महाराष्ट्रातील सहकार, कृषी, मत्स्यउत्पादन, ऊर्जा, उद्योग ही क्षेत्रे विस्तारलेली आहे. महाराष्ट्रात रेल्वेचे जाळेही मोठ्या प्रमाणात विस्तारले आहे. मुंबईची लोकल सेवा ही जगातील सर्वात मोठी उपनगरी लोकल सेवा आहे त्यामुळे रेल्वेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या हाती नक्कीच काहीतरी लागेल अशी आशा करायला हरकत नाही. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून आयकराची सीमा वाढवली नव्हती त्यामुळे मध्यमवर्गीय करदाते मोदी सरकारवर नाराज होते. आयकराची सीमा वाढवावी अशी मागणी करदात्यांमधून केली जात होती यावर्षी तरी ही मागणी मान्य होईल अशी आशा करदात्यांना होती. करात सूट मिळावी यासाठी दिल्लीकडे चेहरा करून बसलेल्या मध्यमवर्गाचा हिरमोड अर्थमंत्र्यांनी होऊ दिला नाही. आयकराची मर्यादा ५ लाखांहून ७ लाख करण्यात आली. अर्थमंत्र्यांचा हा मास्टर स्ट्रोक मानला जात आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर आयकराची मर्यादा वाढवल्याने मध्यमवर्गीय आपल्या पोतडीत मतांची बेगमी टाकतील अशी आशा सरकारला आहे अर्थात ती कितपत फलद्रुप ठरते हे पाहण्यासाठी किमान वर्षभर थांबावे लागेल. मध्यमवर्गीयांना खुश करतानाच गरिबांना २ लाख कोटींचे धान्य १ वर्ष मोफत देण्याची घोषणा करून आपणच गरिबांचे तारणहार आहोत हे दाखवण्याचा प्रयत्नही अर्थमंत्र्यांनी केला आहे.




अर्थसंकल्पात महिला वर्गाला देखील खुश करण्याचा देखील प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला आहे. अर्थसंकल्पात महिलांवर लक्ष ठेवून उज्ज्वला योजनेत वाढ करतानाच टपालाची बचत योजना दोन वर्षासाठी खुली करण्याचे जाहीर केले आहे. मोबाईल - टीव्ही यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू तसेच इलेक्ट्रिक वाहने स्वस्थ करून तरुण वर्गाला आकर्षित करण्याचा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला आहे. एकूणच आगामी निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच हा अर्थसंकल्प सादर केला असून सर्व वर्गांना खुश करण्यासाठी घोषणांचा पाऊस पाडला आहे. अर्थात या घोषणांचे मतपेटीत रूपांतर होईल का हे येणारा काळाच सांगेल.

**शाम ठाणेदार**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# विजेलाही मिळते शाबासकी



मोहन दिवटे, लातूर
संपर्क क्र. 9860440900

आधुनिक केसरी

**तर मग, विजेच्याच नशिबी एवढा संताप का? कुणी मान्य करा अथवा न करा ! तरीही पुन्हा सांगतो, माझ्यासह तुमच्या-आमच्या, सर्वांच्या बहुतांश गरजा या विजेवर अवलंबून आहेत. अगदी मोबाईल चार्जींग पासून ते मोठयातले मोठे सर्व व्यवहार विजेवर अवलंबून आहेत. देशात कृषी क्षेत्रात झालेल्या क्रांतीत विजेचे भरीव योगदान राहिले. औद्योगिक क्रांती विजेमुळे झाली. अगदी अलीकडच्या काळातील डिजिटल क्रांतीतसुध्दा विजेचा वाटा मोठा आहे. देशात झालेले व होत असलेले सर्व कल्याणकारी बदल विजेशी जुळलेले आहेत. थोडक्यात, देशाच्या विकासात तिचे महत्त्व तोला-मोलाचेच आहे !**

वीज ही एवढी अत्यावश्यक आहे की, तिच्या अस्तित्वाशिवाय जगण्याची कल्पनाही करता येत नाही. मात्र, ती कधी थोडीशी खंडित झाली की, प्रत्येक जण अनावर होतो. अनेकांच्या संतापाला पारावार राहात नाही. तसे ते स्वाभाविकही आहे. पण अशा प्रसंगी पहिल्यांदा हे लक्षात घेतले पाहिजे की, वीज उद्योग हा काही वायरलेस नाही. तिच्या यंत्रणेचे मोठे फिजिकल जाळे आहे. ते राज्यात ३.०८ लाख वर्ग किलो मीटर्स इतक्या भौगोलिक क्षेत्रात उभारलेले आहे. त्यात ४५७ शहरे आणि ४१९२८ गावांचा समावेश आहे. अर्थात, राज्यात वजिेची यंत्रणा सर्वत्र उघडयावर पसरलेली आहे. महावितरणच्या या जाळयात भूमिगत आणि उपरी पध्दतीच्या उच्च व लघुदाबाच्या ११.३१ लाख किलो मीटरच्या वीज वाहिन्या आहेत. त्यात वितरण रोहित्रांची संख्या ८ लाख २२ हजार इतकी आहे. ४०९४ इतकी वीज उपकेंद्र आणि स्विचींग सेंटर्स आहेत.

वीज निर्मिती, पारेषण आणि शेवटच्या स्तरावर करण्यात येणारे तिचे वितरण हे मुख्यतः उपकेंद्र, वितरण रोहित्र, लाखो किलो मीटर लांबीच्या उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांच्या जाळयातून होते. स्वाभाविकपणे, विजेच्या या जाळयावर मानव निर्मित किंवा ऊन-वादळ-वारा, पावसासारख्या इतर नैसर्गिक संकटांचा प्रभाव नेहमीच पडतो. त्यामुळे वीज यंत्रणा प्रभावित होऊन ती खंडित होत असते. अशा प्रसंगातही विजेचे नसणे किंवा तिचे खंडित होणे मात्र कुणालाही सहन होत नाही. कधी-कधी लोक नको त्या पध्दतीने संताप व्यक्त करतात. याचा अर्थ असा नव्हे की, खंडित वीज पुरवठा सहन करावा. मात्र, वस्तुस्थिती अशी असते की, खंडित झालेला वीज पुरवठा कायम खंडित स्थितीत कधीच राहात नाही. तो काही वेळात, शक्य तितक्या लवकर पूर्ववत होतच असतो. तांत्रिक बिघाडामुळे किंवा अन्य कारणाने खंडित झालेला वीज पुरवठा पूर्ववत करण्यामागे यंत्रणा काम करीत असते. अगदी जीवसुध्दा संकटात टाकून बरेच जण काम करीत असतात.



अर्थात, गेलेली वीज सहजासहजी किंवा अपोआप कधीच येत नसते. तरीही तिला कुणी समजूनच घेत नाही ! ती खंडित झाली की संताप..! ती पूर्ववत झाल्यानंतरही तिच्या पूर्ववत होण्यामागचे प्रयत्न कुणी का विचारात घेत नाही? नाही..! आता दिवस बदलायला लागलेत. सवयीप्रमाणे संताप व्यक्त करणारे अनेक जण असतीलहीपण, आता कुणी तरी विजेबदल प्रामाणिकपणे चांगलं बोलायला लागलंय. विजेच्या यंत्रणेलाही शाबासकी मिळायला लागली आहे. हे लक्षात घेतलं पाहिजे.

आता पूर्वीचे दिवस राहिलेले नाहीत. विजेच्या व्यवहारात दिवसागणिक काटेकोरपणा वाढत आहे. सध्याचे महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल हे कुठल्याही व्यवस्थेत प्रभावी मायक्रो मॅनेजमेंट राबविणारे वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत. आयआयटी रुरकी येथून ते स्थापत्य अभियांत्रिकीचे गोल्ड मेडॅलिस्ट पदवीधर असून दिल्ली आयआयटीचे एम-टेक आहेत. यापूर्वी त्यांनी जळगावचे जिल्हाधिकारी असताना नदीजोड सारख्या महत्त्वाच्या प्रकल्पावर उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. त्या व इतर अनेक गौरवास्पद कार्याबदल त्यांचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेकवेळा सन्मानही झालेला आहे. एक फेब्रुवारीला त्यांना महावितरणमध्ये दोन वर्षे झाली. दोन वर्षांच्या काळात त्यांनी महावितरणला आर्थिक शिस्त लावली. अचूक बिलिंग इफिशियन्सी वाढवून महसुल वसूलीवर प्रभावी कामगिरी करण्यात आली. सोबतच त्यांनी ग्राहक समाधानावर यंत्रणेचे लक्ष केंद्रीत केले. पॉवर क्रायसिसच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही राज्यात कुठे भारनियमन करण्याची नामुस्की महावितरणवर येऊ दिली नाही. खर्च कपात, वीज खरेदी-पुरवठा आणि महसुल वसूलीत करडी शिस्त जोपासण्यात ते यशस्वी ठरले. २०२३ च्या सलामीलाच २४,७५० मेगावॅट इतका विक्रमी वीज पुरवठा महावितरणला करता आला. हा त्यांच्या इफेक्टिव्ह मॅनेजमेंटचा परिणाम दिसतो.




राज्यात ग्राहकांकडे महावितरणची थकबाकी मोठी आहे. ती सुमारे ७३ हजार कोटी रुपयांच्या घरात आहे. मात्र, त्यात अध्यक्ष श्री. सिंघल यांनी फारशी वाढ होऊ दिली नाही. वाढणारी थकबाकी रोखण्यात त्यांचे मायक्रो मॅनेजमेंट प्रभावी ठरले आहे. पारंपरिक ऊर्जा क्षेत्रातही त्यांनी प्रभावी कामगिरी केली. केंद्र सरकारच्या लक्ष्याधारित कार्यक्रमानुसार छतावरील सौर ऊर्जा क्षमता वाढीसाठी प्रभावी प्रयत्न झाले. परिणामी, राज्यात १२९४ मेगावॅट सौरऊर्जा उत्पादन झाले. मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेचे शंभर टक्के उदिष्ट साध्य करण्यात महावितरणला यश प्राप्त झाले. उच्चदाब वितरण प्रणाली योजनेतही भरीव कामगिरी करण्यात येत आहे. शिवाय, वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करून विजेच्या वितरण व वाणिज्यिक हानीचे प्रमाण कमी करण्यात यश आले. यंत्रणा नादुरुस्तीचे प्रमाणही घटले गेले. परिणामी, महावितरणच्या ग्राहकसेवा सुधारण्यासाठी अधिक मदत झाली.

भविष्यातही राज्याच्या ऊर्जा क्षेत्राला त्यांच्याकडून अधिक चांगल्या अपेक्षा आहेत. त्यांच्यामुळे महावितरणच्या सन्मानात अधिक वाढ होताना दिसून येते. सारासार, राज्यात चांगली वीज सेवा देणारी सरकारी कंपनी म्हणून महावितरण नावारूपाला येताना दिसते. याची अनेक उदाहरणे सांगता येतील. त्यापैकी नेमकेपणाने सांगायचे झाले तर, उटी(बु.) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची (ता. औसा, जिल्हा लातूर) भिंत बोलकी आहे. उटी हे गाव सुमारे दोन-आडीच हजार लोकवस्तीचे. ते स्वछता, आरोग्य, रस्ते विकास व शिक्षणाच्या बाबतीत संपन्न आहे. उटी हे जिल्हा पातळीवर (२०२२ मध्ये) स्वच्छतेच्या बाबतीत पहिले आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी गावची पाहणी करून चांगल्या कामगिरीबदल गावकऱ्यांचे आणि गावाला सेवा देणाऱ्या यंत्रणाचेही कौतुक केले. उटी गावची ग्रामपंचायत, माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख व्यापारी संकुल आणि जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा लक्ष्यवेधी आहे. शाळा व्यवस्थापनाने शाळेला कम्पाऊंड वॉल बांधले आहे. त्यापैकी एका भिंतीवर अगदी दर्शनी भागात गावातील कौतुकास्पद उपक्रमांची नोंद घेण्यात आली असून त्यातून विविध सेवांबाबत त्या त्या यंत्रणांना शाबासकी देण्यात आली आहे. “दोन वर्षांत आमच्या शिक्षणाचे वाजले असते बारा.. पण, महावितरणची साथ मिळाल्याने सुरु राहिला ज्ञानाचा झरा” अशा मथळयाखाली महावितरणच्या अखंडित वीज सेवेचा जाहीर गौरव करण्यात आला आहे. वीज यंत्रणेसाठी कौतुकाची ही बाब तशी फार महत्त्वाची नसावी. पण, त्यातून वीज कर्मचाऱ्यांचे आत्मबल वाढू शकते. त्यातून अधिक चांगल्या कामासाठी ऊर्जा निर्माण होते. महावितरणची यंत्रणा तशी उटी गावाप्रमाणे इतर सर्वच गावांना अखंडित वीज पुरवठयाची सेवा देत असते. पण, इतरत्र सहसा कुणी फारसं बोलत नाही. पण, उटीच्या शाळेची ही भिंत जगजाहीरपणे चांगलं बोलताना पाहायला मिळते. उटी हे गाव महावितरणच्या बुधोडा शाखेअंतर्गत आहे. तिथं सहायक अभियंता म्हणून सुदर्शन बोळेगावे तर जनमित्र वसीम महेबूब पटेल हे कार्यरत आहेत. गावात तारेवर कुठे आकडा नाही, वीजचोरी नाही. तिथं वापरलेल्या विजेच्या देयकांचा भरणा नियमित असतो. गावकरी आणि शाळा व्यवस्थापनाने महावितरणच्या केलेल्या गौरवाबदल मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनीही बोळेगावे आणि जनमित्र पटेल यांचे अभिनंदन केले. इतर ठिकाणीही कौतुकास्पद कामगिरी करणारे महावितरणचे असंख्य हात आहेत. तेही लोकांना दिसावेत. त्यांचेही असेच कौतुक व्हावे. अशी माफक अपेक्षा.

# सर्वसमावेशक व निवडणुकीला सामोरे जाणारा केंद्रीय अर्थसंकल्प

आधुनिक केसरी

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केंद्रीय अर्थसंकल्प नुकताच लोकसभेत सादर केला. अर्थसंकल्प सर्वसमावेशक व दूरदृष्टी असलेला आहे .या अर्थसंकल्पामुळे अर्थकारणाला गती मिळेल. जेष्ठ नागरिक, नोकरदार महिला, शेतकरी, मजूर तसेच उद्योजक यांना दिलासा देणारा हा अर्थसंकल्प आहे यात शंका नाही. अर्थसंकल्पातील सर्वात मोठी सवलत पगारदार नोकरांना मिळाली आहे . सात लाखांपर्यत उत्पन्नांत कोणतेही कर नाहीत.**

मैला साफ करणाऱ्या मजुरांना आता दिलासा मिळणार असून ते काम आता मशिन्स द्वारे करण्यात येणार आहे. गरीबांना मोफत धान्य आणखी एक वर्ष वाढविण्यात येणार आहे. ४० वर्षापर्यत असणाऱ्या नागरिकांचे हेल्थ स्क्रिनिंग होणार आहे. तंबाखू व त्याचे दुष्परिणाम लक्षात घेऊन सिगारेटवर १६ टक्के कर इतकी जबरी वाढ करण्यात आली आहे. आदिवासी मुलांसाठी असलेल्या एकलव्य शाळेत ३८ हजारांहून अधिक शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म व डाळीसाठी विशेष हब स्थापन करण्यात येणार आहे. कोरोनामुळे बाधित लघु व मध्यम उद्योगांना दिलासा मिळालेला आहे. एमएसएमईना ९ हजार कोटींची हमी मिळणार आहे. यासह त्यांना २ लाख कोटी रुपयांचे एक्स्ट्रा कोलॅटरल फ्री मिळू शकेल महिलांना दोन लाख रुपयांच्या बचतीवर वार्षिक ७. ५ टक्के व्याज मिळणार आहे. ३ वर्षासाठी शेतकऱ्यांना १कोटी रुपयांची मदत मिळणार आहे. राष्ट्रीय अप्रेन्टिस योजनेच्या माधयमातून ४७ लाख तरुणांना स्टॅआयपेन्ड मिळणार आहे जेष्ठ नागरिकांना गुंतवणूक करण्यास असलेले मर्यादा १५ लाखाहून ३० लाख अशी करण्यात आली आहे बांधकाम क्षेत्राला दिलासा देणाऱ्या




काही गोष्टींची तरतूद करण्यात आली आहे. सर्वसमावेशक विकास, शेवटच्या घटकांपर्यत विकास, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक, क्षमता विस्तार हरित विकास , आर्थिक क्षेत्राचा विकास, युवाशक्ती या सात प्राथमिकता म्हणजेच सप्तर्षी ला महत्व दिलेले आहे पर्यटन क्षेत्राला मिशन मोड मध्ये चालना दिली आहे.

**या अर्थसंकल्पात काही गोष्टी हव्या होत्या ---**

जेष्ठ नागरिकांना रेल्वे मध्ये सवलतीची घोषणा नाही कोरोना काळापासून ही सवलत बंद आहे.

वाढती बेकारी कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नोकऱ्या उपलबध करून देणे जरुरीचे आहे .

अर्थसंकपात संरक्षणासाठी तरतूद ५. ९४ लाख कोटी आहे . चीनच्या वाढत्या प्रभावामुळे ही तरतूद कमी वाटते.

महागाईला तोंड देण्यासाठी कोणतीही योजना नाही.

इंधनावरील करांच्या रकमेत कोणताही बदल नाही.

जीएसटी दरामध्ये कोणतीही कपात नाही.

पेट्रोल -डिझेल, सिमेंट, खते यांच्या दरात कपात नाही.

असंघटित क्षेत्रातील शेतमजूर स्त्रियांसाठी काही सवलती अपेक्षित होत्या.

रेल्वे साठी २. ४० लाख कोटी रुपयांची तरतूद आहे पण रेल्वेचे स्वतंत्र अंदाजपत्रक हवे.

मनोरंजन सृष्टीला उद्योगाचा दर्जा नाही .

एकूणच येत्या काही महिन्यातच देशाच्या काही राज्यात विधानसभेच्या निवडणूका आहेत. त्यानंतर पुढील वर्षी म्हणजेच २०२४ च्या मध्यास लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक होणार आहे .पुढील वर्षी पूर्ण बजेट असणार नाही त्यामुळे यंदाच्या बजेटला महत्व आहे या दृष्टीने या अंदाजपत्रकडे पाहिल्यास हे अंदाजपत्रक योग्य वाटते.

**शांताराम वाघ, पुणे**

# आरोग्यदायी तूप

आधुनिक केसरी

तूप भारतीय स्वयंपाकघरातील एक महत्त्वाचा भाग समजला जातो. क्वचितच असे घर असेल जिथे तुप वापरले जात नाही. तूप फक्त चवीलाच उत्तम नाही तर त्याचा सुगंध जेवणाला अधिक अप्रतिम बनवतो. बहुतेक लोक याचा वापर डाळ, भाजी करण्यासाठी तसेच चपातीवर लावण्यासाठी करतात. तूप केवळ जेवणाची चवच वाढवत नाही तर अनेक आरोग्यदायी फायदेही देतो. पण जर तुम्हाला तुपाचे फायदे दुप्पट करायचे असतील तर येथे सांगितलेल्या ५ गोष्टींसह त्याचे सेवन सुरू करा.

आयुर्वेद तज्ज्ञ डॉ शरद कुलकर्णी सांगतात की, तुपात अनेक औषधी गुणधर्म आहेत. जे तुमच्या शरीराला अनेक आजारांपासून वाचवण्याचे काम करतात. हळद, कापूर, तुळस, दालचिनी यांसारख्या औषधी वनस्पतींसोबत तूप खाल्ल्यास त्याचे फायदे दुप्पट होतात. फक्त एकदा किंवा दोनदा याचे सेवन करणे तुमचे आरोग्य सुधारण्यासाठी पुरेसे आहे.

**तुपासोबत हळद खावी :** तूप मिसळून हळद खाण्याचा सल्ला तज्ञ देतात. हे मिश्रण वजन कमी करण्यास, नवीन रक्तवाहिन्या तयार करण्यास, हृदयाचे आरोग्य सुधारण्यास आणि किडनी निरोगी ठेवण्यास मदत करते. यासोबतच हे मिश्रण शरीरात होणारी जळजळ कमी करते.

**मिश्रण कसे तयार करावे :** हळदीच्या चवीचं तूप बनवण्यासाठी एका भांड्यात १ कप तूप टाका आणि त्यात १ टीस्पून हळद घाला. हे मिश्रण एअर टाईट बरणीत साठवा आणि वापरा.

**तुपासह तुळशीचे सेवन करा :** तुळशीचे शरीरासाठी अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. याच्या पानांमध्ये अ, क आणि के जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात असतात. त्यात कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, लोह आणि पोटॅशियम देखील असतात. तज्ञ म्हणतात की तुळस रक्तातील साखर, लिपिड आणि रक्तदाब पातळी सामान्य करण्यास मदत करते. याशिवाय मानसिक ताणतणावातही मदत होते.

**दालचिनीबरोबर तूप घ्या :** दालचिनीमध्ये अँटी-व्हायरल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात. यासोबतच दालचिनी रक्तातील साखर कमी करण्यास मदत करते आणि पोटाच्या समस्यांपासूनही आराम देते. अशा वेळी तूप मिसळून खाल्ल्याने आरोग्याला चांगला फायदा होतो.



# कवितेशी नाळ



जीवनाच्या काही प्रसंगाने
रडता रडता हसवणं शिकविलं
काही क्षणभराच्या आनंदाने
हसता हसता रडवणं शिकविलं
हसत्या रडवत्या जीवनाने
मला परिस्थितीशी लढायला
शिकविलं
लढता लढता स्वआसवाने
या दुनियात जगायला
शिकविलं
स्नेही प्रेमी स्वभावाने
हृदयात घर करायला शिकविलं
आपल्या पवित्र आचरणाने
मनपटलावर प्रतिमा कोरायला
शिकविलं
कितीही आपुलकीने जपल्याने
कुणीच कुणाचं नसल्याचं
शिकविलं
स्वत:च स्वत:वरच्या विश्वासाने
जीवनाची नाव हाकण्याचं
शिकविलं
शब्द शब्दाच्या गुंफनाने
कविताशी नाळ जोडायला
शिकविलं
कविताच्या सुमधूर सहवासाने
अनेकाअनेक धडे गिरवायला
शिकविलं
आई-वडिलांच्या संस्काराने
जगी नाव कमवायला
शिकविलं
म्हणूनच सुनीलच्या लेखनीने
साहित्यक्षेत्रात ठसा उमटवायला
शिकविलं...

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

# संत विचारांतून मानसिक आरोग्य



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

आधुनिक केसरी

**संतांच्या प्रत्येक शब्दात, अक्षरात, उकारादि मात्रांतही एक विचार असतो. माणसांचे कल्याण व्हावे, त्याचे आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक अशा तीनही तापांची शांती व्हावी, यासाठी "बुडत हे जन देखवेना डोळा |" किंवा "ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभेविण प्रीती।।" या भूमिकेतून संतांनी लोकप्रबोधन केले आहे.**

आज स्पर्धेचे युग आहे. यश किंवा अपयश पचवताना आबाल वृद्ध युवक असे सर्वांना अडचणीला सामोरे जावे लागू शकते. मोठ्या पदाच्या आणि पगाराच्या नोकऱ्या किंवा यशाच्या शिखरावर असताना देखील माणसांकडे मानसिक आरोग्य असेलच असे खात्रीने सांगता येत नाही. अशा प्रसंगी संत विचार हे माणसाला कोसळू देत नाहीत. संत विचार माणसाला अस्थिर होऊ देत नाहीत. स्थिर करतात. मन आरोग्य संपन्न करतात. शिक्षणशास्त्र-चर्चेत असे म्हटले जाते की, माणूस हा अधिकाधिक ज्ञान त्याच्या नेत्र या इंद्रियाद्वारे प्राप्त करतो. तद्वत माणसाचे मानसिक आरोग्य हे अनेकवेळा त्याची विचार करण्याची पद्धती आणि बोलण्याची, ऐकून घेण्याची रीत यावर देखील अवलंबून असते, असे म्हणता येणे शक्य आहे.

**कसे बोलावे?**

या बद्दल कैवल्यसाम्राज्यचक्रवर्ती माऊली ज्ञानोबाराय फार सुंदर सांगतात –

**तैसे साच आणि मवाळ । मितुले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे।।** खरे आणि मवाळ, कमी (नेमके) आणि रसाळ, माधुर्यपूर्ण असे अमृत कल्लोळासम शब्द उच्चारावेत. अर्थात येथे माऊलींना खरे बोलणे, कमी बोलणे म्हणजे नेमके बोलणे आणि रसाळ म्हणजे रसांनी परिपुष्ट बोलणे अपेक्षित आहे. रामकथा : नल नील कथा : विचारल्याशिवाय सांगू नये. या बाबतीत रामकथेत एक प्रसंग सांगण्यात येतो की, नल आणि नील या वानरांनी कोणतीही वस्तु फेकली, तर ती तरंगत असे. हे ते दोघेही जाणत होते. मात्र समुद्रावर राम सेतु उभारताना भगवान रामचंद्रांना ही गोष्ट साक्षात समुद्राने सांगितली. मात्र नल आणि नील यांनी स्वतःहून सांगितले नाही. पुढे त्यांना भगवान रामचंद्रांनी असे करण्याचे कारण विचारले, तेव्हा ते म्हणाले की, आपण विचारल्याशिवाय आम्ही आपल्याला कसे सांगणार? अर्थात आपण कमी बोललो, तर लोक आपले शब्द ऐकायला उत्सुक असतात. त्यामुळे लोक आपल्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत नाहीत. अन्यथा आज केवळ माझे कुणी ऐकून घेत नाही, ऐकत नाही या तक्रारीने मानसिक आरोग्यावर आघात होऊ शकतो.

**कसे राहावे?**

जीवनात कसे राहावे, या विषयी जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराजांनी अनेक ठिकाणी नितांत सुंदर आणि हितकारी असा उपदेश केला आहे. एका अभंगात संत श्री तुकोबाराय म्हणतात की,

**हेचि थोर भक्ति आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ॥ १ ॥**
**ठेविले अनंते तैसेचि राहावे । चित्ति असो द्यावें समाधान ॥ २ ॥**
**वाहिल्या उद्वेग दुःखची केवळ । भोगणें तें फळ संचिताचे ॥ ३ ॥**
**तुका म्हणे घालू तयावरी भार । वाहूं हा संसार देवा पायी ॥ ४ ॥**

अर्थात आपल्याला जी संसाराविषयी माया वाटते, प्रेम वाटते ते प्रेम भगवंतांना समर्पित करावे. ही थोर अशी भक्ती आहे. ती देवाला आवडते. पुढे तुकोबाराय म्हणतात की, अनंताने जसे ठेवले, तसे राहावे. आणि चित्तात समाधान असू द्यावे. (येथे एक गोष्ट ध्यानात ठेवावी की, सामान्य माणूस आपल्या जीवनातील



सुख दुःखांचे कारण प्रारब्ध मानतो. तर वैष्णव आयुष्यातील सुख दुःखांचे कारण भगवंतांची इच्छा मानतो. त्यामुळे त्याचे समायोजन साधले जाते.) उद्वेगाचे वहन केल्याने दुःखच होणे. जे संचिताचे फळ आहे, ते भोगणे क्रमप्राप्त आहे. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात की, हा संसार भगवंतांच्या पायी अर्पण करू. सर्व भार भगवंतां सोपवू आणि आपण निवांत राहू. अर्थात फळाची चिंता न करता आपण आपले कर्तव्यकर्म करीत राहू.

मन तरल आणि शुद्ध ठेवणे आवश्यकः

**चित्त शुद्ध तरी शत्रू मित्र होती। व्याघ्रहि न खाती सर्प तया ।।**
**विष अमृत आघात ते हित। अकर्तव्य नीत होय त्यासी ।।**
**दुःख ते देईल सर्व सुख फळ। होतील शीतळ अग्निज्वाळा।।**
**आवडेल जीवा जीवाचिये परी। सकळां अंतरी एक भाव।।**
**तुका म्हणे कृपा केली नारायणें। जाणिजे ते येणे अनुभवे।।**

मानसिक आरोग्यासाठी मन हे शरद ऋतूतील आकाशाप्रमाणे निरभ्र स्वच्छ शुद्ध असले पाहिजे. मनात कसलेही मळभ नसावे. हे सांगताना जगद्गुरू संत श्री तुकोबाराय म्हणतात की, चित्त शुद्ध असेल, तर शत्रू देखील मित्र होतात. सर्व दुःख सुद्धा शांत होतील. ताप शांत होतील.

**मैत्री जपणे आवश्यक:**

आपण जेव्हा समवयस्कांसोबत असतो, तेव्हा आनंदी असतो. ही मैत्री टिकविण्यासाठी ऐकण्याची तयारी ठेवा. अनुभवजन्य ज्ञान खूप असतं पण कुणाला सांगावं हा प्रश्न असतो. म्हणून जो ऐकतो, त्याचे मित्र वाढतात आणि तो सुखी होतो. आनंदी राहतो. "**भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे**" असे माऊली ज्ञानोबाराय देखील सांगतात. वेळेचे महत्व आणि कार्याचे महत्व यांचा प्राधान्यक्रम लावणेः आपल्याला एखादे कार्य करायचे आहे, करावे वाटते तर त्या कार्याला लागणारा वेळ आणि त्याची आवश्यकता यांचा प्राधान्यक्रम आपण लावला पाहिजे. समजा मला नामस्मरण करायचे आहे आणि कुणी तरी WHATSAPP ग्रुपवर क्रियाशील व्हा असे सांगत आहे, तर मला जास्त आनंद कशात आहे, याचा विचार करून मी माझे प्राधान्य निर्भीडपणे व्यक्त करावे.

**नामस्मरण करा. जन वन आम्हा समानचि झाले ।**
**कामक्रोध केले पावटणी ।**
**षडउर्मी शत्रु जिंकिले अनंता । नामाचिया सत्ताबळे तुझ्या ।**

जगद्गुरू संत श्री तुकोबाराय सांगतात की, भगवंता, तुमच्या नामाच्या बलामुळे जन-वन हे सर्व आम्हाला समान झाले आहे. आम्ही कामक्रोधाच्या पायाखालील पायऱ्या केल्या आहेत. अर्थात त्यांवर जय मिळविला आहे क्षुधा, तृषा, शोक,मोह,जरा,मरण या सहा उर्मी आणि काम,क्रोध,लोभ,मोह,मद, मत्सर हे सहा शत्रू यांना सुद्धा जिंकले आहे.

असे सामर्थ्य नामाचे आहे. म्हणून माणसाने नेहमी नामस्मरण करावे. शांतीब्रह्म संत श्री एकनाथ महाराज भगवंतांच्या चिंतनाचे महत्व प्रतिपादन करताना म्हणतात –

**ऐसे चिंतनाचें महिमान । तारिले अधम खळ जन ।**
**चिंतने समाधान । प्राणिमात्रा होतसे ॥२॥**
**चिंतनें तुटे आधीव्याधी । चिंतने तुटतसे उपाधी ।**
**चिंतने होय सर्व सिद्धि । एका जनार्दनाचे चरणीं ॥३॥**

एकंदरच संतांनी सामान्य जनांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने विपुल आणि महत्वपूर्ण असा उपदेश त्यांच्या अभंग, ओव्या या माध्यमातून केला आहे. या विषयावर एखादे मोठे पुस्तक, प्रकल्प होऊ शकेल इतके हे मार्गदर्शन व्यापक आहे. इति लेखनसीमा !

# नरवीर तानाजी मालुसरे

आधुनिक केसरी

**तानाजी मालुसरे हे शिवाजी महाराजांचे मावळे होते. त्यांचा जन्म 1626 मध्ये सातारा जिल्ह्यात झाला. हे शिवाजी महाराजांच्या सैन्यातील एक सुभेदार होते. तसेच शिवाजी महाराजांचे बालपणीचे सवंगडी सुद्धा होते. तानाजी मालुसरे यांचा परिवार हा मूळचा पाचगणी जवळील गोडोली गावचा आहे. तानाजी मालुसरे यांचे वडील काळोजीराव यांचे तेथे वास्तव्य होते. तानाजी मालुसरे यांचे बालपण गोडली येथे गेले. शिवरायांनी बालपणातच स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली, तेव्हा पासूनच तानाजी मालुसरे शिवरायांच्या सोबत होते.**

तेथून पुढे शिवरायांच्या अनेक मोहिमा लढायांमध्ये विश्वासू सहकारी म्हणून तानाजी सहभागी असत. त्यांच्यातील स्वराज्यनिष्ठा व लढवय्येपणा पाहून शिवरायांनी त्यांना महाबळेश्वर-पोलादपूर परिसरातील बंदोबस्ताची जबाबदारी सोपवली होती. त्यावेळी या भागात दरोडे खोर यांचा मोठा उपद्रव वाढला होता. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उमरठ या गावी ते आपल्या परिवारासह स्थायिक झाले. त्यानंतर 1659 मध्ये प्रतापगडावर शिवराय व अफजल खान यांच्याबरोबर झालेल्या युद्धात त्यांनी अफजलखानाच्या सैन्याचा समाचार घेतला होता. नरवीर तानाजी अजरामर झाले.

ते सिंहगडाच्या लढाईत 1665 मध्ये झालेल्या पुरंदरच्या मिर्झाराजे जयसिंग बरोबर झालेल्या तहानुसार स्वराज्यातील 23 गड-किल्ले औरंगजेबाला द्यावे लागले होते. त्यात सिंहगडाचा देखील समावेश होता. परंतु पुढे महाराज मोठ्या गतीने आग्र्याच्या कैदेतून सुटून आलेले सर्व गड किल्ले परत स्वराज्यात सामील करण्याचा सपाटा त्यांनी लावला. राजगड मुक्कामी असताना जिजाऊ शिवरायांना समोरील सिंहगड परतंत्र येत असल्याची खंत होती. त्यावेळी गडाचे नाव कोंढाणा होते. महाराजांचा मनसुबा एकूण लढवय्ये तानाजी मालुसरे यांचा मराठी बाणा जागृत झाला. 'आधी लगीन कोंढाण्याचे, मग रायबाचे' असे म्हणत.

सिंहगड स्वराज्यात आणण्याचा विडा त्याने उचलला अष्टमीच्या काळोखात, तानाजी मोजक्या मावळ्यांसह गड घेण्यास तानाजी, उदयभान हे दोनच वीर समोरासमोर आले. या दोन योद्धामध्ये घनघोर युद्ध झाले. उदयभानूच्या एका वाराने तानाजी धारातीर्थी पडले. भाऊ सूर्याजी व शेलार मामा यांनी चवताळून उदय भाण्याच्या फौजेचा धुव्वा उडवला. उदय भांडणाचा खात्मा करून गडावर भगवा निशान चढवून गड स्वराज्यात घेतला. तानाजी मालुसरे असे नाव घेतले की, लोकांना त्यांच्या सिंहगडावर गेल्या. केलेल्या पराक्रमाची आठवण होते. त्यांनी केलेल्या पराक्रम विषयी सर्वसामान्य माणसाला माहिती नाही. तानाजी मालुसरे संगमेश्वरचे युद्ध हे असेच अपरिचित युद्ध म्हणून त्याची इतिहासात नोंद आहे. या युद्धाला हवे आहे तेवढे महत्त्व देऊन लेखकांनी जगासमोर मांडला. संगमेश्वरी असतांना शत्रूने केलेल्या आकस्मात हल्ल्यादरम्यान तानाजीने कमालीचे धाडस दाखवले होते. या प्रसंगाचे तपशीलवार वर्णन चिपळूण, संगमेश्वर काबीज झाले. राजापूर लुटले गेले. या बातम्या धडाधड आदिलशाहीच्या कानावर आदळत होत्या. तो या बातम्यांनी अस्वस्थ झाला. त्याने लगेच शृंगारपुरच्या सूर्याजी आदेश केला. तो त्याला म्हणाला, "तो (शिवाजी महाराज) आमचा शत्रू राजापूर वर चालून जात असताना, त्यास तु का अडवले नाही. असो, ते जाऊ दे, तो आता परत त्याच मार्गाने जवळ आला आहे. तेव्हा त्यास तेथे व त्याच्याशी युद्ध कर." आदिलशाहीच्या दबावाखाली सूर्याजीने शिवाजी महाराजांच्या विरोधात उघड उघड शत्रुत्व धारण केले. स्वराज्यासाठी कोंढाणा किल्ला जिंकण्याची जबाबदारी छत्रपती शिवाजी महाराजांनी तानाजी मालुसरेवर सोपवली. तेव्हा तानाजीला जबाबदारी समजली तेव्हा ते स्वतःच्या मुलाच्या लग्नाच्या तयारीत होते. त्यांनी ती तयारी अर्धवट सोडली. स्वराज्यासाठीचे आपले काम प्रधानात घेऊन जबरदस्त चौक्या-पहारे व अतिशय कडेकोट बंदोबस्त असलेला आणि उदयभानसारखा पराक्रमी किल्लेदार असलेला कोंढाणा किल्ला ताब्यात घेण्यासाठी विडा उचलला. ते कोंढाणा जिंकण्यासाठी आपल्या तुकडी बरोबर निघाले 'आधी लगीन कोंढाण्याचे, मग रायबाचे' हे त्यांचे शब्द इतिहासात अजरामर आहेत. कोंढाणा गडावरचा किल्लेदार उदयभान राठोड एक शूर माणूस होता. त्याच्या हाताखाली सुमारे 1500 यांची फौज होती. 4 फेब्रुवारी 1670 च्या रात्री तानाजी मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली राजगडावरुन निघालेले मराठा सैन्य गुंजवणी नदी पार करत सिंहगडाच्या पायथ्याला येउन पोहोचले. ती भयाण



काळोखी रात्र होती. कोंढाण्यावर जाण्याचा मार्ग त्यांनी निवडला तो म्हणजे शत्रूच्या ध्यानी मनी न येणारा प्रचंड असा द्रोणगिरीचा कडा रात्रीच्या वेळी केवळ 500 सैनिकांबरोबर हा कडा चढून त्यांनी सिंहगडावर हल्ला केला. कोंढाणा किल्यावरच्या तुकडीला कळू न देता किल्ला दिवसात चढणे कठीण होते. तानाजींनी गडाच्या मागच्या बाजूने आपल्या घोरपडीला वर पाठवले तिच्या शेपटीला दोर बांधला होता. मावळे त्या दोरीला पकडून चढू लागले. अचानक हल्ला करून त्यानी तेथील सैन्याला कात्रीत पकडले आणि अखेरच्या श्वासापर्यंत लढाई करून त्यांनी हा किल्ला जिंकायचे प्रयत्न केले.

शत्रूशी बेभान होऊन लढताना तानाजींच्या हातातील ढाल पडल्यावरही डाव्या हातावर घाव घेत उदयभानाला निपचित पाडूनच स्वतःचे प्राण तानाजींनी सोडले. मात्र त्यांच्यामागुन सूर्याजी मालुसरे आणि शेलारमामा यांनी नेतृत्व करून हा किल्ला काबीज केला. गडावरील गवताच्या गंज्या पेटवून किल्ला जिंकला गेल्याचा इशारा राजांना राजगडावरती दिला. ही घटना 4 फेब्रुवारी 1670 रोजी घडली.

# संत रविदास : एक मानवतावादी संत



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र. : ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**मानवतावादी संत म्हणून सुविख्यात असलेले व ज्यांची गणिती संतांमध्ये येते असे संत शिरोमणी संत रविदास. या संत रविदासाची जयंती दि. ५ सप्टेंबरला आहे. या निमीत्याने या लोकप्रिय संताचा घेतलेला आढावा. संत रविदासाचा जन्म १३७७ मध्ये गोवर्धनपूरला झाला. कोणी म्हणतात की मंडूरला झाला. पर्यायानं सांगायचं झाल्यास जन्माबाबत संभ्रम आहे. संत रविदास हे बालपणापासूनच चिकीत्सक बुद्धीमत्तेचे होते.**

समाजात दोन समुदाय आहेत. एक समूदाय असा आहे, की तो चमत्कार मानतो व दुसरा समूदाय असा आहे, की जो चमत्कार मानत नाही. कोणी म्हणतात की त्यांनी चमत्कार केले. ते चमत्कार त्यांच्या जन्मापुर्वीपासूनच झाले. जसे. त्याच्या बाळंतपणाच्या वेळी त्याचं बाळतंपण करणा-या दाईच्या डोळ्याला स्पष्ट दिसणे. गंगा अवतरणे वैगेरे. पुढे ते मोठे होत असतांना त्यांच्या हातून साापाचा दंश उतरणे, ब्राम्हण भोजाच्या वेळी प्रत्येक पंगतीतच रविदास दिसणे एवढंच नाही तर कटोऱ्यात गंगा दिसणे. म्हणूनच म्हटलं जातं की मन चंगा तो कटौती मे गंगा. असा चमत्कार केला संत रविदासांनी. असे मानणारा एक गट. या गटानुसार जर संत ज्ञानेश्वर भिंत चालवू शकतात, तर रविदास कटो-यात गंगा अवतरु शकत नाही का? याबाबत दुसरा गट म्हणतो की चमत्कार वैगेरे काही नाही, ते ब्राम्हण वादाचं षडयंत्र आहे. ते भासमान भ्रमण आहे. असो, ती याबाबत न बोललेलं बरं.



संत रविदास यांच्याबाबत मत मांडत असताना महत्वाचं सांगावंसं वाटतं की संत रविदासांनी जनकल्याणासाठी कार्य केले. समाजात माजलेली दांभीकता दूर केली. त्यातच लोकांना ज्ञानाचा मार्ग सांगीतला. समाजातील पाखंडवाद दूर केला. भेदभाव लक्षात घेवून त्यांनी सांगीतलं की प्रत्येक माणूस हा जन्मतः समान असून तो उच्चनीचता मानणारा नाही. प्रत्येकाचं हाड, मास, रक्त हे सारखंच असतांना तो उच्च वा तो कनिष्ठ कसा? प्रत्यक्ष परमेश्वर जन्म देतांना भेदभाव मानत नाही. हवा, आपल्याला हवा देतांना भेदभाव करीत नाही. तसाच झाडं अन्न देतांना भेदभाव करीत नाही. तसंच पाणी देखील प्रत्येक जीवाचा भेदभाव करीत नाही. प्राणीमात्राही असा भेदभाव करीत नाहीत. गाय दूध देतांना हा अस्पृश्य वा हा उच्च असा भेदभाव करीत नाही. मग आपण मानवानं भेदभाव का करावा? मानसानंही भेदभाव करु नये.

रविदासांनी हेच सांगीतलं लोकांना आपल्या सत्संगातून. त्यांनी समाजाला जागृत करण्यासाठी सत्संगाचा मार्ग अनुसरला. त्याचा परिणाम की काय, लोकं मोठ्या संख्येनं जागृत होवू लागले. त्यातच रविदासाचे शिष्य बनू लागले. त्यांचा मोठा शिष्यपरीवार आजही अस्तित्वात आहे.

रविदासाचा आज जरी जास्त शिष्य परिवार असला तरी त्यावेळी मोजता येण्यालायक शिष्य होता. त्याच्या शिष्य परिवारात मोठमोठे राजेमहाराजे होते. चितोडची महाराणी झाली ही रविदासाची शिष्या होती. तसंच महाराणा सांगा, महाराणा विक्रमजीत, महाराज नागरमल, शहंशाहा बाबर याशिवाय अनेक राजे रविदासाचे शिष्य होते. त्यातच काही राजांनी त्यांना राजगुरुही बनवलं होतं. याशिवाय संत पीपा, संत कबीर हे सुद्धा रविदासांना सन्मान देत.

रविदासांनी बालपणापासूनच अस्पृश्यतेच्या झळा शोषल्या. पंडीत वा पुरोहित वर्गानं रविदासांना कसं छळलं याचा इतिहास आपल्याला इतिहास सांगतो. रविदास जगू नये म्हणून धर्ममार्तंड त्यांची कुरघोडी राजांना करीत गेले. परंतू धर्ममार्तंडाच्या कुरघोडीनं रविदासाचं बरंवाईट झालं नाही. ते त्यांच्याजवळ सखोल ज्ञान होतं. जेव्हा त्या ज्ञानाच्या भरवशावर ते प्रत्येक कुरघोडीतून तरुण निघाले. कोणी त्याला चमत्कार नाव दिलं. कोणी त्या गोष्टीला ज्ञानवंतांचा शिक्का दिला.

रविदास हे बरेच वर्ष जगले. ती कोणी म्हणतात की ते एकशे सव्वीस है वर्ष जगले तर कोणी एकशे एक्कावन वर्ष जगले असं म्हणतात. त्यानंतर कोणी म्हणतात की रविदास वैकूंठाला गेले तर कोणी म्हणतात की रविदासाची हत्या झाली. कारण त्यांचा मृतदेह सापडला नाही. फक्त पादत्राणे सापडली. ती त्या पादत्राणावरुन निष्कर्ष काढला गेला. त्यानंतर रविदासप्रेमी लोकांनी जिथं पादत्राणं सापडली होती तिथं रविदासाचं मंदीर बांधलं.

काळाच्या ओघात रविदास गडप झाले. त्यांना लोकं विसरले होते. परंतू त्यांचं साहित्य अजरामर ठरलं. ते साहित्य लोकांनी वाचलं. ते साहित्य मनाला भावलं. पटलं व लोकांनी निर्णय घेतला की रविदास हे काही छोटे संत नाही. त्यांच्यामध्ये मोठी शक्ती आहे. रविदासांनी जनकल्याणासाठी स्वतःची लिपी तयार केली. कारण पुर्वीची असलेली लिपी वाचनाचा अधिकार धर्ममार्तंडांना होता. त्या लिपीला वाचन करण्याचा अधिकार ना स्त्रियांना होता ना अस्पृश्यांना. म्हणून ती लिपी. महत्वाचं म्हणजे रविदासानं जकल्याणकारी कार्य केले. समाजातील भेदभाव, पाखंडवाद दूर केला व समाजात सौहार्दपूर्ण वातावरण ठेवले. त्यामुळं ते महान संत ठरलेले दिसतात असं म्हटल्यास आतिशयोक्ती ठरणार नाही. यामुळंच त्यांना मानवतावादी संत म्हणतात.

# कार्यकारणभाव हेच फलनिष्पत्तीचे मुळ असते

आधुनिक केसरी

आपला हेतू स्वच्छ असेल तर निसर्ग सुद्धा आपल्या सोबत असतो. ही अंधश्रद्धा नसुन आपल्या आसपास घडणाऱ्या अनेक घटनांचे निरीक्षण केल्यानंतरच वास्तवादी मत आहे.जर आपला हेतु अशुद्ध असेल तर कितीही प्रयत्न केले तरीही फार उपयोग होत नाही.पण हे समजण्यासाठी सुद्धा विवेक जागृत असला पाहिजे. जीवनामध्ये प्रत्येक व्यक्ती काही तरी मिळविण्यासाठी धडपडत असतो .घडपड करणं प्रयत्न करणं यामध्ये गैर काहिच नाही. पण महत्वाचं असतं ते धडपडीचा मार्ग नेमका कसा आहे .सदरचा मार्ग कोणत्या दिशेने जातो यानुसार फलनिष्पत्ती म्हणजे फलप्राप्ती ठरत असते .कोणतही कार्य हे सहज नसत त्या कार्य पाठीमागे कार्यकारण भाव असतो. मग तो स्वार्थ असेल अथवा निस्वार्थ या पैकी एका भाव तर निश्चितच असतो . कार्य करत असताना कधी स्वार्थ खुला असतो . स्वार्थ खुला असणं अभिनंदनीय बाब आहे. अनेक कार्यात निस्वार्थ भाव असतो .हे कार्य कौतुकास्पद असते .पण अनेकदा कार्यकारण भाव वेगळा प्रकटीकरण वेगळं दाखविण्याची पद्धत वेगळी म्हणजे हे सगळं अडुन असत .हे सगळ्यांत घातक असतं आशा वेळी निसर्ग फार साथ देत नाही.जिथं निस्वार्थ असतो .तिथं मात्र कार्यासाठी सर्व अनुकुल बाबी आपोआप घडतात .आणि परिणाम पण अनुकूल येतात. जिथं कार्य मध्ये थेट स्वार्थ असतो तिथंही फार अडचणी येत नाहीत.पण जिथं अडुन असत तिथं किती ही प्रयत्न केले तरीही फलनिष्पत्ती बहुतांश वेळा होत नाही.कारण कार्यकारण भाव खोटा असता कामा नये.कोणत्याही कार्याच्या पाठीमागे एक फळ दडलेल असतं कधी कधी हे फळ उघड असतं कधी कधी कार्य हाती घेणारा च्या मनात असत. अनेक कार्य हि निस्वार्थ भावनेने असतात तर अनेक कार्य हि व्यक्तिगत हेतुने प्रेरीत असतात. पण कधी कधी सार्वजनिक हेतु च्या अडुन व्यक्तिगत हेतु असतात. मुळात कार्य कोणतही असेल त्या कार्य मागे कार्यकारण भाव वेगवेगळे असतात आणि जसा भाव तस फळ हे निश्चित सुत्र व गणित आहे. दैनंदिन जीवनात आपण अनेकदा वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत असतो .आपण प्रयत्न करताना आपला हेतू जर निसर्गाशी सुसंगत म्हणजे नैतिकतेच्या आधाराला धरून असेल तर मग मात्र आपल्याला फाळ प्राप्ती मिळतेच .कार्यसिद्धी हि कार्याच्या भावानुरूपच ठरत असते .एखाद्य कार्य करताना आपला भाव शुद्ध असेल तर निसर्ग आपली शक्ति ते कार्य यशस्वी होण्यासाठी वापरतो हे वास्तव आहे . सत्कार्याचा करता करविता हा भगवंत असतो . कोणीही कितीही विघ्न निर्माण केले तरीही सत्कार्य हे थांबत नाही ते निरंतर गतीमान असतं. कोणत्याही कार्यात भाव हा खुप महत्व पुर्ण असतो.आपण जेव्हा एखाद्य कार्य हाती घेतो तेव्हा आपल्या मनात वास्तविक भाव काय आहे. या नुसारच ते कार्य यशस्वी होत किंवा त्या मधुन काहीच निष्पन्न होत नाही. म्हणजे थोडक्यात एरंडाच गुरहाळ होत .कोणत्याही कार्याचा शुभारंभ करताना कार्याची संकल्पना मांडताना हेतू भाव हा लोक उपयोगी असला पाहिजे.पण त्या मागेआत्मकेंद्री भाव नसला पाहिजे.जर आत्मकेंद्रित भाव असेल तर तर मग मात्र कितीही प्रयत्न केले तरीही त्या मुलंभावा नुसारच फलनिष्पत्ती येत असते .भाव स्वच्छ निरपेक्ष असेल तर कार्य यशस्वी होणारच. यशस्वी व्हावं पुढे जावं किंवा एखाद्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करावी हि प्रत्येकाची धडपड असते.पण याच दरम्यान आपल्या मनात असणारा मुख्य हेतू हा कसा आहे तो हेतुच यश किंवा अपयश आपल्या पदरात टाकत असतो .पण नेमकं हिच बाब अनेकदा आपल्याला उमजत नाही कळत नाही. महणुन आपण आपलीच फसवणूक करून घेतो . वास्तविक जे काही मिळवायचे आहे ते लपवायचे कशासाठी उद्दीष्ट धेय्य हे खुलं असलं पाहिजे.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

तेव्हा निसर्ग सुद्धा आपल्या मदतीला धावून येतो . मुळात मिळवायचं काही असो आपला हेतू स्वच्छ आणि प्रमाणिक असला पाहिजे. स्वार्थ असला तरी सुद्धा हेतु शुद्ध असवा . म्हणजे कार्यकारण भाव निर्मळ असला तर फलनिष्पत्ती पण अनुकूल होते. पण सध्या लोक दाखवतात वेगळं करतात वेगळं बोलतात वेगळं वागतात वेगळं म्हणून अनंत नानाविध प्रयत्न करून सुद्धा गुप्त इप्सित साध्य करू शकत नाहीत.याच मुख्य कारण म्हणजे भाव शुद्धी नाही जोपर्यंत भाव शुद्ध नाही तोपर्यंत उचित फळ मिळणार नाही हे निश्चित असतं . म्हणून अंतरयामी भाव शुद्ध ठेवा सत्कार्य करा योग्य फळ निश्चिंत मिळाल्या शिवाय राहत नाही.

**(लेखक हे संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य तथा वंजारी समाज ईतिहास अभ्यासक व लेखक बालसंस्कार शिबिर अध्यात्मिक मार्गदर्शक आहेत)**

# के सी आर महाराष्ट्रात लढवणार ?



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री आणि तेलंगणा राष्ट्र समिती या प्रादेशिक पक्षाचे अध्यक्ष के सी राव यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करून सीमोल्लंघन केले. के सी राव यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर आपल्या पक्षाची बैठक बोलवली होती या बैठकीला तेलंगणा राष्ट्र समितीचे २८३ आमदार खासदार व जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते.**

या बैठकीत के सी आर यांनी आपला पक्ष राष्ट्रीय राजकाणात प्रवेश करणार असल्याची घोषणा केली इतकेच नाही तर त्यांनी आपल्या तेलंगणा राष्ट्र समिती या पक्षाचे भारत राष्ट्र समिती असे नामकरणही केले. राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करण्याच्या त्यांच्या घोषणेचे उपस्थित सर्व आमदार खासदार व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले होते विशेष म्हणजे के सी आर यांनी आपल्या राष्ट्रीय राजकारणाची सुरवात महाराष्ट्रातून केली आहे. तेलंगणा राज्याच्या निर्मितीसाठी लढा देणाऱ्या के सी आर यांच्या पक्षाला राष्ट्रीय दर्जा मिळाल्यानंतर पक्ष विस्ताराची सुरवात ते महाराष्ट्रातून करणार असून त्यादृष्टीने या पक्षाकडून महाराष्ट्रातील काही जागा लढविण्यात येणार आहे. त्यात गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी विधानसभेचा समावेश आहे. अहेरीचे माजी आमदार दीपक आत्राम यांनी काही दिवसांपूर्वी के सी आर यांची भेट घेतली होती. या भेटीत के सी आर यांनी दीपक आत्राम यांना पक्षात प्रवेश करण्याची ऑफर दिली होती. आता हा पक्ष प्रवेश उद्या म्हणजे ५ फेब्रुवारीला नांदेडमध्ये होण्याची शक्यता आहे. या पक्ष प्रवेशानंतर दीपक आत्राम हे अहेरीमधून बी आर एस पक्षाचे अधिकृत उमेदवार असतील अशी घोषणा होण्याची शक्यता आहे. दीपक आत्राम सारखा माजी आमदार असलेला मोहरा गळाला लागल्याने के सी आर जाम खुश आहे. अहेरी मतदार संघाचा बराचसा भाग तेलंगणा सीमेला लागून आहे. त्या भागात तेलगू भाषिक नागरिक मोठ्या संख्येने आहेत. त्यादृष्टीने बी आर एस ने त्या भागावर लक्ष केंद्रित केले आहे. केवळ गडचिरोलीच नव्हे तर विदर्भ आणि मराठवाड्यावर देखील के सी आर यांचे लक्ष आहे. विदर्भ आणि मराठवाडा हे राष्ट्रीय राजकारणात शीरण्याची कवाडे असल्याचे के सी आर यांचे मत आहे त्यामुळेच त्यांनी या भागात कार्यकर्त्यांचे जाळे विणण्यास सुरवात केली असून इतर पक्षातील दिग्गज नेत्यांना आपल्या पक्षात आणण्याची योजना त्यांनी आखली आहे. के सी आर यांनी महाराष्ट्रातून राष्ट्रीय राजकारणात उडी घेतल्याने अनेकांना आश्चर्य वाटत असले तरी राजकारणातील जाणकार व्यक्तींना मात्र याचे जराही आश्चर्य वाटले नाही कारण मागील दोन वर्षात के



सी आर यांनी जे राजकारण केले आहे ते राष्ट्रीय राजकारणात उडी घेण्याचेच निदर्शक होते. विशेषतः के सी आर यांनी तेलंगणामध्ये जेंव्हा दुसऱ्यांदा पूर्ण बहुमत मिळवून सत्तेत आले तेंव्हापासून ते स्वतःला राष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू मानू लागले आहेत. सुरवातीला म्हणजे मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कारकिर्दीत त्यांनी मोदींशी जुळवून घेतले आणि काँगेस व चंद्राबाबू नायडू यांच्याशी पंगा घेतला मात्र तेलंगणामधून काँग्रेस आणि चंद्राबाबू नायडू यांचा तेलगू देसम पक्ष कमकुवत झाले तसे त्यांनी भाजपला प्रमुख विरोधक मानून भाजपला विरोध सुरू केला. के सी आर यांचा भाजप विरोधाला केवळ स्थानिकच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणाचीही किनार आहे ती अशी की, केंद्रात भाजपला प्रमुख विरोधक असलेली काँग्रेस गलितगात्र झाली आहे अशावेळी विरोधी पक्षांची मोट बांधून विरोधी पक्षांच्या आघाडीचे नेतृत्व आपल्या हाती आले तरी आपण २०२४ ला पंतप्रधान पदाचे दावेदार ठरू असे स्वप्न त्यांना पडत आहे त्यामुळेच गेली काही दिवस ते सातत्याने विरोधी पक्ष नेत्यांच्या भेटी घेत आहेत. मागील काही महिन्यात त्यांनी सोनिया गांधी, शरद पवार, नितीश कुमार, अरविंद केजरीवाल, स्टॅलिन, ममता बॅनर्जी या विरोधी पक्ष नेत्यांच्या भेटी घेतल्या आहेत. सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन २०२४ साली भाजप समोर एक पर्याय उभा करावा असे त्यांनी या नेत्यांना सांगितले आहे. प्रसंगी विरोधी पक्षांची आघाडी करून त्या आघाडीचे नेतृत्व करण्याची तयारीही त्यांनी दर्शवली आहे. विरोधी पक्षांची आघाडी करून भाजपला शह देण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य असला तरी तो वाटतो तितका सोपा नाही कारण वर उल्लेख केलेले सर्वच नेत्यांची पंतप्रधान होण्याची इच्छा आहे. २०२४ साली जर विरोधी आघाडीचे संख्याबळ भाजपपेक्षा अधिक झाले तशी होण्याची शक्यता नाहीच तरीही समजा तसे झाले तरी वर उल्लेख केलेले नेते के सी आर यांना पंतप्रधान म्हणून स्वीकारणार नाही. शिवाय वर उल्लेख केलेल्या सर्वच नेत्यांची विचारधारा वेगळी आहे त्यामुळे ते किती काळ एकत्र राहतील हा प्रश्नच आहे. त्यामुळे विरोधी पक्षांची आघाडी करणे आणि तिचे नेतृत्व करणे हे के सी आर यांचे स्वप्नच ठरण्याची शक्यता आहे. नरेंद्र मोदी यांची जागा घेण्याची के सी आर यांची महत्वाकांक्षा म्हणूनच हास्यास्पद ठरते. राजकीय नेत्यांच्या मनी महत्वाकांक्षा हवीच मात्र अशी महत्वाकांक्षा बाळगताना स्वतःचे हसे होणार नाही याचीही काळजी राजकीय नेत्यांनी घ्यायला हवी. राष्ट्रीय राजकारणात उतरून के सी आर यांनीही असेच स्वतःचे हसू करून घेतले आहे काय ?

# विचाराने श्रीमंत व्हा !

आधुनिक केसरी

प्रत्येकाच्या जीवनात विचाराला खुप मोठे महत्त्व आहे. आपल्या विचारावरूनच आपली पारख केली जाते. की आपण कसे आहोत . त्यासाठी जीवनात चांगले विचार आत्मसात करण्याची गरज निर्माण झाली आहे. आपण पैसे कमवून श्रीमंत होऊ शकतो. परंतू विचाराने मोठे नाही. आपल्याला मोठं व्हायचे असेल तर आधी विचाराने श्रीमंत झाले पाहिजे.आज सभोवताली केवळ पैसा कमविणे हेच जीवनाचे उद्दिष्ट झाले आहे. परंतू याच्याही पुढे जाऊन आपल्याला वेगळा विचार करावा लागणार आहे. केवळ पैसा म्हणजे सर्वस्व नाही. पैशाने सुख, सुविधा मिळतील.पण विचार नाही. आपल्याकडे ज्याच्याकडे जास्त पैसा तो श्रीमंत माणुस मानले जाते.

खरं म्हणजे पैसा एवढीच एकमेव संपत्ती आहे असं मानणे चुकीचे आहे. जो माणूस विचाराने श्रीमंत आहे. त्याला श्रीमंत समजले गेले पाहिजे. श्रीमंतीची व्याख्या बदलण्याची गरज आहे.आज विचारांनी श्रीमंत असलेला माणूस मात्र दुर्लक्षित झाला आहे. आज एखादा निर्णय घेत असताना त्याच्याकडे किती ज्ञान आहे.याकडे पाहीले जात नाही.परंतू एखादा श्रीमंत असलेला व्यक्तीच्या शब्दाला किंमत दिली जाते.आज पैशाने लोक श्रीमंत झाली. परंतू विचाराने गरीब झाली. आजच्या काळात विचाराला किंमत देण्याची वेळ आली आहे. ज्याच्याकडे चांगले विचार तो खरा श्रीमंत माणूस होय. **संतोष दत्तू शिंदे**

# सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे : पराक्रमाचे स्थळ दर्शन




रवींद्र मालुसरे
९३२३११७७०७

आधुनिक केसरी

**आपला शिवकालीन इतिहास तेजस्वी आहे. पूर्वजांच्या रक्ताचा, स्वाभिमानाचा, शौर्याचा, निष्ठेचा आणि शहाणपणाचा वारसाहक्क आपल्याकडे आहे. त्यांचा इतिहास जर आपण विसरत चाललो तर वर्तमानकाळापेक्षाही आपला भविष्यकाळ काजळलेला दिसेल हे सांगायला नको. “शिवरायांचा सिंह पडला समरांगणी मराठा गडी यशाचा धनी” असा गौरव इतिहासाच्या पानापानात सुवर्णाक्षराने शिवछत्रपतींच्या ज्या सुभेदाराचा झाला आहे त्या नरव्याघ्र नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमाची गाथा महाराष्ट्राला आणि मराठी मनाला आजवर सतत स्फूर्तिदायी ठरत आली आहे. नरवीर तानाजींनी भावनेपेक्षा आणि स्वतःच्या कुटुंबाच्या कर्तव्यापेक्षा स्वराज्याची किंबहुना राष्ट्रकार्याची हाक ऐकली आणि हे करताना स्वामीकार्यासाठी स्वतःच्या रक्ताचा सडा शिंपडून प्राण अर्पण केले. अशा नरवीर तानाजी-सूर्याजी मालुसरे या पराक्रमी दोन बंधूंच्या महान कार्याचे सिंहावलोकन शौर्यदिनी करणे हेच इतिकर्तव्य ठरणारे आहे. शिवकाळाच्या इतिहासाबाबत अनेक गोष्टी नव्याने पुढे येत आहेत. नवनवीन ऐत्याहासिक कागदपत्रे आणि साधने उपलब्ध होत आहेत, त्यामुळे जुने संदर्भ कालबाह्य ठरत आहेत. वादविवाद होत आहेत.**

आधुनिक तंत्रज्ञान आणि बदललेली शिक्षण पद्धती लक्षात घेऊन वाडवडिलांनी जपलेला इतिहास आपल्या पुढच्या पिढीकडे संक्रमित होत राहणे गरजेचे असते.

'आधी लगीन कोंढाण्याचे मग माझ्या रायबाचे' किंवा 'गड आला पण माझा सिंह गेला' अशी इतिहासात झालेली नोंद म्हणजेच नरवीरांचा इतिहास नव्हे तर तानाजीवांच्या देदीप्यमान अद्वितीय तेजस्वी पराक्रमाची गाथा सांगणारा शाहीर तुलसीदासाने रचलेला शिवकाळातला पहिला पोवाडा आणि अशा इतर बऱ्याच प्रसंगांची नोंद इतिहासात आजही उपलब्ध आहे.



तानाजी क्षात्रकुलोत्पन्न 'मल्ल' राजवंशीय कुळातील होता. अकराव्या शतकातील आपत्काळात 'मल्ल' घराण्यातील एक शाखा कोकणात जावळी मुलुखात आश्रयास आली. त्या शाखेतील 'नाईक' हा तानाजीचा हुद्दा असावा. प्रतापगड युद्धानंतर किल्ले राजगड आल्यानंतर शिवरायांनी तानाजीला तावून-सुलाखून पहिल्यानंतर पायदळाच्या हजारी मनसबदार केले.

मात्र त्याच्या हाताखाली एक हजार पायदळ जेधे, बादलांसारखे एकाच बिराजरीचे नव्हते, तसेच एकाच मुलुखातील नव्हते. मोहिमेप्रसंगी सैन्याबरोबर एक हजार हशमांचे मिश्र पायदळ सुद्धा दिले जाई. तानाजी मालुसरे स्वराज्यातील कधीही कोणत्याही वतनी सुभ्यावर नियुक्त नव्हता. शिवाजी राजांच्या स्वराज्यात प्रत्यक्ष वतने देण्याचा प्रघात नव्हता. त्याच्या आधी 'सुभेदार' हे उपपद लावले गेले. सुभेदार ह्या शब्दाचा अर्थ लष्करातील अधिकारी. सुभा म्हणजे प्रांत . पण तानाजीराव प्रांताधिकारी नव्हते. जेधे शकावलीत तानाजी मालुसरे यांच्या निधनानंतर नोंद आहे की,तान्हाजी मालुसरा राजश्रीकडील हशमांचा सुभेदार पडिला. कारण मराठी साम्रज्याच्या छोट्या बखरीत असा उल्लेख आहे की, तानाजीला जावळीच्या मोर्यांच्या मुलुखात कोणतेही वतन नव्हते. म्हणून तो शिवरायांच्या खड्या सैन्यात कायमस्वरूपी पगारी नोकरीत होता. म्हणूनच राजगडावरील सुवेळा माचीवर लष्करी सेनाधिकाऱ्याच्या वस्तीसमूहात त्याचे घर होते. तानाजीराव मालुसऱ्यांचे पूर्वज तापी नदीच्या उतारावर सातपुड्याच्या जंगल काठावरचे मूळचे राहणारे लढवय्ये म्हणूनच दौलताबाद व नंतर अहमदनगर व वाईला आले. शेवटी ते पांचगणीजवळील गोडोलीला येऊन राहिले. तानाजी मालुसरे यांचे वडील काळोजी व त्यांचा भाऊ भोवरजी किंवा भोरजी हे गोडोलीचे रहिवाशी. या गोडोलीवर परक्यांची स्वारी नेहमीच येई. म्हणून काळोजी व भोरजी यांनी शिवाजी महाराजांचा पक्ष घेतला. आणि फत्तेखानाच्या स्वारीच्या वेळी त्याचे पारिपत्य करण्याची प्रतिज्ञा या दोन्ही भावांनी वाई जवळच्या आकोशी व नालवाडी या गावी घेतली. आसगावच्या शिंगाण नावाच्या डोहाजवळ झालेल्या सभेत या दोन्ही भावांनी विडे उचलले.

वाईच्या सुभेदाराला ही बातमी लागली. त्याने गोडोलीवर अचानक हल्ला करून या दोन भावांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. आणि एकाएकी एके रात्री विजापूरकरांचा वाईचा सुभेदार त्या गावात आला. त्याने त्या गावावर अचानक हल्ला करून संपूर्ण गाव बेचिराख करून काळोजी,भोरजी व गोडोलीच्या शूरवीर गावकऱ्यांची कत्तल केली. तानाजीच्या आईने आपल्या दोन मुलांना घेऊन ब्रम्हारण्याचा रस्ता धरला. भोरजीचे मुलगे त्याच्या मामांकडे कोयना खोऱ्यांत फुरस गावाला गेले. तर तानाजी व सूर्याजी या बारा व दहा वर्षाच्या मुलांना घेऊन त्यांची मातोश्री आसऱ्यासाठी प्रतापगडाच्याखाली करंजे गावातून उमरठला आली. तानाजीच्या मातोश्रीने उमरठ गावाजवळच डोंगरात एक घळ आहे, त्यात शिळ्या भाकऱ्या खाऊन तीन दिवस काढले. १०-१५ माणसे सहज बसतील अशी उत्तराभिमुख ही घळ अजूनही उमरठ लगतच्या डोंगराच्या उतारावर आहे. एक अबला आपल्या लहान मुलांना या ठिकाणी राहतेय हे गावकऱ्यांना जेव्हा कळले तेव्हा त्यांनी या माऊलीला गावात आणले. तोपर्यंत तिचा भाऊ शेलार त्यांचा शोध घेत उमरठला पोहोचला होता. शेलारमामाने त्यांच्या वाट्याला आलेले दुःख गावकऱ्यांना सांगितल्यानंतर त्यांनी एक खोपट बांधून दिले आणि नाचणी,वरी पिकविण्यासाठी काही एकर वरकस जमीनही दिली. त्या उमरठ गावात तानाजी-सूर्याजी आठ-दहा वर्षात गावचेच नव्हे तर साखर खोरे, कामथे खोरे, किनेश्वर खोरे, गोळेगणी खोरे, आणि शिवथर खोऱ्यातही प्रसिद्ध झाले होते. शरीर कमावण्यासाठी ते जोर जोडी, मल्लखांब करीत व दिवसभर काबाडकष्ट करीत. तरवार,भाला,बोथाटी चालवता चालवता तो समशेर बहाद्दर झाला. दांडपट्ट्याचे हात इतके सफाईने



तो करी की पट्टा चालविणारे सराईत वेळ गडी त्याच्याकडे टकमक पाहत रहात. वेष पालटण्यातही तो तरबेज होता. कधी सरदारी पोशाखात तो आपल्या जाडजूड काळ्या मिश्याना पीळ घालून बसला म्हणजे त्याचा थाट सरदारी दिसे. गोंधळी म्हणून गेला म्हणजे ओंगळ वंगाळ अडाणी दिसे. दोन्ही भाऊ शेती करीत अन लढाईचे डावपेच शिकत महाड प्रांतात मोठे प्रख्यात झाले.

बिरवाडीचा माल पाटील हा विजापूरच्या आदिलशाहीत एक जबरदस्त आसामी म्हणूनच मानला जात असे. हा मुलुख जरी जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांच्या राज्यात मोडत असला तरी त्या मुलुखातील सर्व किल्ले आदिलशाहच्या प्रत्यक्ष ताब्यात होते. ऐन जिनसी शेतसारा व नक्त पैशातील शेतसारा मोऱ्याचे अधिकारी वसूल करीत. हे किल्लेदार मन मानेल तसा कारभार करीत असत. माल पाटलांनी याच्या तक्रारी अनेक वेळा केल्या तरी गडावरचा हवालदार मुसलमान असे व तो निशस्त्र प्रजेवर अनेक प्रकारे अन्याय करीत असे. सय्यद कबीर हा लष्कर प्रमुख तर हवालदार रहितमत खान हा नरपशू अधिकारी होता. हे पादशाही लष्कर रायगडावरून ज्या गावाला जाई त्या गावावर मोठे संकट येई. मोऱ्याचे तसेच मालपाटलाचे काही जमेना. तानाजीने नवतरुणांची एक प्रचंड सेना उभारली. हाक मारल्याबरोबर हत्यारबंद तरुण बाहेत पडत व त्यांचा बंदोबस्त करीत. अफझुलखानाच्या स्वारीच्या वेळी तानाजीचे मावळे करंजे-देवळे व गोळेगणी - पैठणच्या खोऱ्यात सशस्त्र तयार होते. तानाजी प्रतापगडावरच भेटीचा सर्व प्रकार दिसेल अशा ठीकाणी बसलेला होता. खानाचा कोथळा बाहेर येऊन तो कोसळल्यानंतर सय्यद बंडा भेटीच्या जागी तिरासारखा धावत गेल्यावर तानाजीही धावत गेला. संभाजी कावजी कोंढाळकर, जीवा महाला व तानाजीने खानाचा चेंदामेंदा टाकला. खानाच्याच ताकदीचा तानाजी यावेळी धावत आला नसता तर काय झाले असते हे कळण्यासारखे नाही असे कॅप्टन मोडक यांनी प्रतापगडाचे युद्ध या पुस्तकात आहे. तानाजी मालुसरे यांनी जावळी खोऱ्याच्या खाली असलेल्या या खोऱ्यात तरुणांची जी एकजूट केली त्यामुळे सन १५ जानेवारी १६५६ या दिवशी जावळीचा पाडाव झाला. त्यामुळे शिवरायांचे काम सोपे झाले,जावळी पूर्णपणे ताब्यात येऊन गुढ्या डोंगराच्या जुन्या गढीचे स्वरूप प्रतापगडात करण्यात आले. तानाजीचा मुलगा रायबा (रायाजी) संभाजी महाराजांबरोबर असे. म्हाळसोजी या संताजी घोरपड्याच्या आजाबरोबरच्या सैन्यात तो नेहमी असे. तानाजीच्या मृत्यूनंतर सूर्याजी त्याच्या कलेवारासह वेल्हाची पेठ, ढोणीचे पाणी, बिरवाडी,भावे या गावावरून उमरठला आला आणि तेथेच राहिला. सूर्याजींचे तीन मुलगे होते. कान्होजी उमरठला राही. भोरजी कडोशी या महाबळेश्वरा पलीकडे असलेल्या गावी राहावयास गेला. तर नाईकजी हा उमरठच्या पायथ्याशी असलेल्या साखर येथे राहू लागला. तानाजीच्या चुलत्याचा म्हणजे भोरजीचा वंश फुरुस या कोयना काठच्या गावाला आहे. त्याचप्रमाणे मालुसऱ्यांचे वंशज साखर, गोडोली, धाकटी वाकी,गावडी, किंवे,आंबेशिवथर, कसबे शिवथर, गोडवली,पारमाची, फुरुस या गावात आजही राहतात. सिंहगडावरील कोंढाणेश्वराच्या देवळाच्या खालच्या अंगास दक्षिणाभिमुख अमृतेश्वर मंदिर आहे. भैरव व भैरवीच्या दोन मूर्ती असून भैरवाच्या चार हातात आयुधे आहेत. जवळच एक कुत्रा कोरलेला आहे. येथे यात्रा व मोठा उत्सव होत असे. त्याकाळी जवळ जवळ दोनशे रुपये खर्च येत असे. सन १७६३ मध्ये भाऊसाहेब पेशव्यांची बायको पार्वतीबाई हिने अमृतेश्वराला सोन्याचा मुकुट दिला होता. सन १७७७ मध्ये नवी मूर्ती बसवण्यात आली. या देवळाच्या मध्येच तानाजी मालुसरे यांची समाधी म्हणजे पूर्वी एक चौकोनी शिखराचे वृंदावन होते. त्यावर सन १९४० साली तानाजीचा अर्ध पुतळा व समाधीचे नूतनीकरण करण्यात आले. तानाजीच्या जुन्या तुळशीवृंदावनाची जागा ही तानाजीचा देह पडल्याची जागा म्हणजे वीरमरणाची जागा होय. त्याचे दहन उमरठला झाले त्याबाबतचा एक पोवाडा काही गोंधळी म्हणून दाखवितात. गडावरून पालखीतून तानाजीचा देह येल्याची पेठ, ढोणीचे पाणी व बिरवाडीतून सरळ साखर खोऱ्यात बोरज वरून उमरठला नेऊन शिवछत्रपती व जिजाबाईंच्या आगमनानंतर त्याला अग्नी देण्यात आला ही गोष्ट सत्य आहे.

सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या घेरेसरनाईकाच्या सोबत केलेल्या बोलचालीचे वर्णन शिवकाळीन समकालीन शाहीर तुळशीदासच्या पोवाड्यातील एका चौकाच्या कडव्यात पुढील शब्द आहेत - धन्य ह्याची नारायणा । कोण तुमचे गाव । एवढे सांगावे आम्हाला । मी साखरेचा पाटील । गेलो होतो पुण्याला । मंडईच्या वाड्यात । गेलो होतो पट्टी लावायला । जात होतो घराला । तेथे वाघाने अडविला । तुमच्या आलो आश्रयाला ।। बाकीच्या वीरांचे देह दहन गडावर झाले असावे व म्हणूनच सतीचे दगड त्या जुन्या वृन्दावना सभोवार आहेत. सन १९३५ साली पुण्यात एक उत्सव मंडळही स्थापन झाले. व आजही ते आहे. या मंडळाने आता बांधलेली समाधी, अर्ध पुतळा व त्यावर मेघडंबरी व सभोवार कठडा या स्वरूपाची आहे.

सिंहगडावर नरवीर तानाजी मालुसरे यांच्या देहसमाधी रुपात राज्याला एक नवी ऐतिहासिक भेट मिळाली आहे. पुणे महापालिकेच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आले आहे. पुरातत्व विभागाच्या मान्यतेनंतर साफसफाई आणि खोदकाम करत असताना ही समाधी उपस्थितांच्या हाती लागली. ही समाधी सापडल्यानंतर अलीकडे शिवप्रेमीनी आनंद व्यक्त केला आहे. वस्तूतः हा इतिहास यापूर्वीच पेणचे इतिहास संशोधक परशुराम दाते यांच्या ५० वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या नरवीर तानाजी मालुसरे यांच्यावरील पुस्तकात हे उल्लेखित आहे.

आज पोलादपूर तालुक्यात उमरठ येथे तानाजी मालुसरे व शेलारमामा यांची समाधी आणि लढाईच्या पावित्रातील ६ फूट उंचीचा भव्य पुतळा आहे. तर जवळच साखर येथे सूर्याजी मालुसरे यांची समाधी आहे. साखर येथील मालुसरे मंडळी पिढ्यान पिढ्या १९३० पासून उमरठ येथे माघ वद्य नवमीला जाऊन आजतागायत नतमस्तक होत शौर्यदिन साजरा करीत आली आहे.

इथेच सुभेदार तानाजीरावांचे चरित्र संपले....पण त्यापासून स्फूर्ती घेत गेल्या ३५० वर्षात अनेक असेच लढवय्ये आपल्या हिंदुस्थानात निर्माण झाले. सुभेदार तानाजीरावांच्या चरित्रात एव्हढी ताकद आहे कि, स्वातंत्रवीर सावरकरांनी देश पारतंत्र्यात असताना जनता पेटून उठावी यासाठी तानाजीच्या जीवनावर एक पोवाडा लिहिला, या पोवाड्यातून गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी हा देश पेटून उठेल हे लक्षात येताच इंग्रज सरकारने त्यावर बंदी आणली.....तानाजीरावांचे चरित्र कितीही गायिले तरी थोडेच. आणि त्यातील थोडे जरी आचरले तरी पुष्कळच.

# विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पहिले तिन्ही विद्यार्थी 'दयानंद वाणिज्य'चे

## बीबीए पदवी परीक्षेत गौरव पटेल विद्यापीठात सर्वप्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम राखत बीबीए या पदवी अभ्यासक्रमात विद्यापीठात सर्वप्रथम, द्वितीय आणि तृतीय याच महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. गौरव पटेल हा विद्यार्थी विद्यापीठात सर्वप्रथम आला आहे. योजना येलगे द्वितीय तर रविना मुंडे तृतीय आली आहे. बीबीए पदवी अभ्यासक्रमात विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पहिले तिन्ही विद्यार्थी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचेच आहेत.

शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये उन्हाळी 2022 परीक्षा विद्यापीठाकडून घेण्यात आल्या. या परीक्षेत दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बीबीए तृतीय वर्गाचा विद्यार्थी गौरव पटेल याने 91.54 टक्के गुण घेऊन विद्यापीठातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे. याच महाविद्यालयाची विद्यार्थिनी योजना येलगे हिने 91.09 टक्के गुण घेत द्वितीय तर रविना मुंडे हिने 90.66 टक्के गुण घेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. तिन्ही विद्यार्थी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या बीबीए विभागाचे असून, यामुळे महाविद्यालयाचा गुणवत्ता यादीतील दबदबा कायम आहे.







विद्यार्थ्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, बीसीए विभाग प्रमुख प्रा.शशिकांत स्वामी, बीबीए समन्वयिका डॉ.वैशाली सातपुते, प्रा. कल्याणी पाटील, प्रा. प्रेमसागर मुंदडा, प्रा.आकांक्षा दरगड, प्रा. दीपिका मुंदडा, प्रा.योगेश शर्मा आदींनी अभिनंदन केले आहे.

# मल्हारराव नाचण डोणगांवकर यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले समाजभूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अखिल भारतीय साहित्य मंडळ, ठाणे यांच्या वतीने परभणी येथे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा दिनांक ३१/०१/२०२३ रोजी संपन्न झाला.



मुक्तवृत्त पत्रलेखक, काव्यलेखक म्हणून कार्यरत असणारे मल्हारराव नाचण डोणगांवकर यांचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय या विविध क्षेत्रात सदैव व निरंतर चालु असलेले कार्य हे गौरवपूर्ण व उल्लेखनिय असे आहे. याची दखल घेऊन त्यांना पुढील कार्य व वाटचालीसाठी उर्जा व प्रेरणा मिळावी या दुरुगामी दृष्टीने मराठी साहित्य मंडळ ठाणे, अध्यक्ष मा. जयप्रकाश घुमटकर यांच्या वतीने मा. घनश्याम पांचाळ, मा. श्रीनिवास के. शेट्टी (उपप्राचार्य शिवाजी महाविद्यालय, परभणी), डॉ. संगिता अवचार, अंजली कांबळे यांचे हस्ते ह्मा. मल्हारराव नाचण डोणगांवकर यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी खालील मान्यवरांची उपस्थिती होती. डॉ. विश्वास वळवी, प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. सुरेश कदम, प्रा. गंगाराम भुतारे, दशरथ मानवतकर (औरंगाबाद), जेष्ठ कवियित्री लता हेडाऊ, स्वाती देशमुख, डॉ. विलास पाटील, डॉ. राजेश गायकवाड. मल्हारराव नाचण डोणगांवकर यांना पुरस्कार प्रदान झाल्याबद्दल कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक, स्नेही, मित्रजन सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे थाटात उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** महावितरणच्या आंतरपरिमंडलीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून झाले. राज्यातील १६ परिमंडलांच्या एकूण ८ संयुक्त संघांचे ७३० पुरुष व ३५३ महिला असे एकूण एक हजार ८३ खेळाडू या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

जळगाव येथील एकलव्य क्रीडा संकुलात गुरुवारी (दि.२) सकाळी साडेनऊ वाजता या स्पर्धेला थाटात सुरुवात झाली. यावेळी सर्व खेळाडूंनी संचलन करीत पाहुण्यांना मानवंदना दिली. यावेळी पोलिस बँडनेही उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले होते. यावेळी नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर, कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता धनंजय औंढेकर, सांघिक कार्यालयातील मुख्य अभियंता भुजंग खंदारे, कोल्हापूर परिमंडलाचे मुख्य अभियंता परेश भागवत, भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे, अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी, यजमान जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता कैलास हुमणे, मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) देवेंद्र सायनेकर, स्पर्धेचे मुख्य समन्वयक तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, एम.जे. कॉलेजचे क्रीडा संचालक श्रीकृष्ण बेलोरकर यांच्यासह महावितरणचे वरिष्ठ अधिकारी मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते.



स्पर्धेचे उद्घाटक डांगे म्हणाले की, महावितरणमध्ये काम करताना कर्मचाऱ्यांना ताणतणावाला सामोरे जावे लागते. त्या तणावातून मुक्त होण्यासाठी तसेच कर्मचाऱ्यांच्या कौशल्याला वाव देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर अध्यक्षीय समारोप करताना डॉ.गोंदावले म्हणाले की, कोरोना काळानंतर पुन्हा स्पर्धा होत असल्याने कर्मचाऱ्यांत उत्साह आहे. कर्मचाऱ्यांनी स्पर्धेतून नवीन ऊर्जा घेऊन त्याचा दैनंदिन कामात सकारात्मक उपयोग करावा. मुख्य अभियंता हुमणे यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात स्पर्धा आयोजनाची संधी दिल्याबद्दल महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांचे आभार मानले आणि सर्व सहकाऱ्यांच्या साथीने स्पर्धा यशस्वी करण्याचे आश्वासन दिले. अपूर्वा वाणी यांनी सूत्रसंचालन केले. सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांनी आभार व्यक्त केले.

उद्घाटनानंतर लगेचच झालेल्या १०० मीटर धावणे स्पर्धेत पुरुष गटात सांघिक कार्यालय-भांडूप परिमंडलाच्या साईनाथ मसने याने प्रथम तर पुणे-बारामती परिमंडलाच्या गुलाबसिंग वसावे याने द्वितीय तर महिला गटात सांघिक कार्यालय-भांडूप परिमंडलाच्या प्रिया पाटील यांनी प्रथम क्रमांक तर नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडलाच्या सरिता सरोटे यांनी द्वितीय क्रमांक पटकविला. त्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदक देऊन सन्मानित करण्यात आले.



# विकास अधिकारी पठाण यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** एलआयसीच्या गुलमंडी (९८ जी) शाखेचे वरिष्ठ विकास अधिकारी एन.एस.पठाण यांना सेवानिवृत्ती निमित्ताने सोमवारी एका कार्यक्रमात निरोप देण्यात आला. गुलमंडी शाखेचे अधिकारी, कर्मचारी व अभिकर्ता यांच्या वतीने निसार पठाण यांचा यावेळी भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. मागील अनेक वर्षांपासून ते शाखेत वरिष्ठ विकास अधिकारी पदावर कार्यरत होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक नविन अभिकर्त्यांना एलआयसीचा एमडीआरटी (अमेरिका) हा बहुमान प्राप्त केला आहे. यावेळी वरिष्ठ शाखाधिकारी प्रभूसिंग परदेशी, सहायक शाखाधिकारी नितीन मगरे, व्ही.एस.समुद्रे, सर्व विकास अधिकारी व अभिकर्ता आदी संख्येने उपस्थित होते.

# किडस केअर इंग्लिश स्कूलला प्रथम पारितोषिक

आधुनिक केसरी न्यूज


**औरंगाबाद :** सांघिक नाटक सादर केले. शाळेला प्रथम पारितोषिक विजेते पद मिळाले. 68 शालाचा सहभाग होता. नाटकाचे नाव मोबाईल व टीव्हीच्या वाढत्या प्रभावाचे दुष्परिणाम. शाळेचे नाव श्री समर्थ बहुउद्दशीय संस्था संचलित किडस केअर इंग्लिश स्कूल, औरंगाबाद नाटकात भूमिका घेतली होती की वैष्णवी गायकवाड रिया चव्हाण विधी अवसर्मोल छोटीशी कु पाणिनी देशमुख स्पॉट एंट्रील करून टाळ्या घेऊन गेली. बेस्ट अभिनय प्रथम पुरस्कार जान्हवी नितीन देशमुख तर दिग्दर्शन प्रथम पारितोषिक सुवर्णा नितीन देशमुख. यांना देण्यात आले. दुतिय क्रमांक बिखरी राहे या नाटकाला तर तृतीय क्रमांक वाढदिवस या नाटकाला मिळाला.



# आर्य रवी देवजी यांचे प्रबोधनपर व्याख्यान संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** हिंद पुनरुत्थान संघ' या संस्थेतर्फे 'कलियुग का समाधान - गीताका ज्ञान' या विषयावर संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष आर्य रवी देव जी यांचे प्रबोधन व्याख्यान, विद्यार्थी सहाय्यक समिती, फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता, पुणे येथे दिनांक ३१ जानेवारी सायंकाळी संपन्न झाले. पुणे स्थित राष्ट्र प्रेमी नागरिक बंधू -भगिनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला हजर होते. गुगल मीट अंतर्गत हे व्याख्यान घरी बसून ऐकण्याचा लाभही अनेक रसिकांनी घेतला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एअर चीफ मार्शल प्रदीप नाईक(निवृत्त) तसेच अभ्यांगतात एअर मार्शल प्रदीप बापट(निवृत्त) व अन्य मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाचा शुभारंभ भारतमाता पूजन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाला. संस्थेचे मुकुंद पुराणिक यांनी अभ्यागतांचे स्वागत केले तर निवृत्त ग्रुप कॅप्टन महाबळेश्वर देशपांडे यांनी संस्थेचा परिचय करून दिला.

श्री रवी देव जी यांनी भगवद् गीतेतील दाखले देत योगेश्वर श्रीकृष्णाच्या जीवन चरित्रातील महत्वाच्या घटनांचे व विविध पैलूंचे दर्शन घडवले, तसेच सद्य आव्हानात्मक परिस्थितीशी सांगड घालीत, या गुण वैशिष्ठ्यांचे महत्व विशद केले.

वक्ते रवि देव यांनी,वाल्मिकी रामायण व तुलसीदास रचित रामचरितमानस हे रामायणाचे प्रमाण ग्रंथ आहेत,असे निक्षून सांगीतले. 'यदा यदा ही धर्मस्य्' व 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशु कदाचन' या श्रीकृष्ण वचनांचा मतितार्थ विस्तृत करीत, ही शिकवण आजही कशी उपयुक्त आहे,याचे उचित मार्गदर्शन केले. महाभारतातील कर्तव्य निष्ठांचा यज्ञ आजही सृष्टीत चालू आहे.

हे सोदाहरण पटवून देत व्यक्तिगत धर्म व राष्ट्र धर्म याची गफलत पितामह भीष्म, द्रोणाचार्य आदी महारथींकडून घडली आणि भारत वर्षाला महाभारत संग्रामाला सामोरे जायला लागले, अशा धड्यातूनच कलियुगात समाधान मिळेल, असे कथन केले. अर्जुनाने उपस्थित केलेल्या वर्ण-संकर शंकेचे समाधान वर्ण- सन्मानात आहे, हे पटवून देतांना आपल्या विहित कर्म-उद्दिष्टपूर्तिंची जाणीव त्यांनी श्रोत्यांना करून दिली. गीतेतील श्रीकृष्ण नीतीचे योग्य मूल्यमापन,छत्रपती शिवाजी महाराज व विद्यमान राज्यकर्ते यांनी आपल्या कारभारात केल्याचे दिसते याचेही स्मरण उपस्थितांना करुन दिले. आचार्य रविद्वजींनी आपल्या मधुर व रसाळ हिंदी वाणीने सभागृहाला मंत्रमोहित केले. महेश आचार्य यांनी आभार व्यक्त केले. वंदे मातरम् या राष्ट्र स्फूर्तिगानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ‘पण पतीचे लावते मी बोचणारे नाव आता’

## आयएमबी राष्ट्रीय कविसंमेलनात प्रकाश क्षीरसागर यांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** मी असे सोडून आले सर्वही गणगोत माझे पण पतीचे बोचणारे लावते मी नाव आता या ओळीने रसिकांचे मन हेलावून गेले. निमित्त होते आयएमबीतील कविसंमेलनाचे. ही गझल होती प्रकाश रामचंद्र क्षीरसागर अर्थात सागर शायर यांची. ‘इन्स्टिटयूट मिनेझिस ब्रागांझा’ तर्फे प्रजासत्ताक दिनाच्या अनुषंगाने पणजीतील आयएमबीच्या सभागृहात बहुभाषिक कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी ही गझल सादर केली. यावेळी बबन भगत यांनी ‘आयक पुता सांगता तुका भारत भुंयची काण’ ही कोकणी कविता सादर केली. रुसी परब या महाविद्यालयीन युवतीनेही आपल्या दोन कविता सादर केल्या. संस्थेचे अध्यक्ष दशरथ परब यांची कविता कालिका बापट यांनी गाऊन सादर केली. वैशाली मोहिते यांनी ‘राधे .. तू पुरती कृष्ण झालीस मुरली झालीस’ ही मराठी कविता सादर केली. राजस्तानातून आलेल्या प्रो. कलाधर आर्य व श्रीमती मोनिका गौर यांनी आपल्या भाषेतील रंगतदार व गेय कवितांनी बहार आणली.

त्यांच्याशिवाय डॉ. ब्रायन मेंडोंसा यांनी इंग्रजीतून व राकेश शर्मा यांनी हिंदीतील आपल्या रचना सादर केल्या. शेतकऱ्यांच्या गळ्याला शेवटी फासच असतो.‘भारत एक कृषि आधारित देश है जहाँ किसान की मौत और बाकी भरपेट है’ ही कविता सादर केली. रसिक श्रोत्यांनी याही कवितेला दाद दिली. गुलाम गौस अन्सारी याने हिंदीतून तर साजीव पुंथापल्ली यांनी मल्याळम भाषेतील कविता सादर करून रसिकांची मने जिंकली.अध्यक्ष प्रो. नरेश सक्सेना यांनी आपल्या अल्पाक्षरी रचनेनेच लोकांचे मन जिंकले.आयएमबीचे सदस्य सचिव गोरख मांद्रेकर यांनी आभार मानले.



मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# तीर्थक्षेत्र असलेल्या पैठण नगरीतून लांब पल्ल्याच्या गाड्या सुरु करा

## बस उपलब्ध नसल्यामुळे वारकरी, पर्यटकांची संख्या रोडावली

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील बसस्थानकातून महत्वाच्या ठिकाणच्या लांब पल्ल्याच्या बंद केलेल्या गाड्या पून्हा सुरू करण्याचे निवेदन आज पैठण शहर व्यापारी महासंघाच्या वतीने आगरप्रमुख श्री सुहास तरवडे यांना देण्यात आले.

पैठण एसटी आगारातील महत्वाच्या व लांब पल्ल्याच्या फेऱ्या आगरप्रमुख यांनी रद्द केल्या जसे की सकाळची महत्वाची अशी मुंबई गाडी, सोलापूर गाडी, शेगाव गाडी अश्या बऱ्याच गाड्या ज्या वर्षानुवर्षे ह्या रस्त्यावर धावत आहेत. पैठण शहराला एक धार्मिक, पर्यटन नगरी म्हणून पूर्ण भारत देशात वेगळी ओळख आहे आणि अश्या निर्णयामुळे शहरातून बाहेरगावी व्यापारासाठी ये जा करणारी व्यापारी, तालुक्यातील वारकरी, पर्यटक ह्यांना त्रा सहन करावा लागत आहे.

तसेच राज्यातून दररोज पर्यटक, वारकरी पैठण शहरात येत असतात त्यांचे ही प्रमाण अशा मुळे घटत असल्याचे दिसत आहे.

तसेच आपल्या आगारातील बहुतांश गाड्या ह्या जुन्या झाल्या त्या रस्त्यावर धावताना बऱ्याच वेळा बंद पडत असून त्या गाड्यांच्या जागी राज्य परिवहन मंडळाने नवीन गाड्या आगारासाठी घ्याव्या जेणेकरून लोकांना नाहक त्रास सहन करावा



लागणार नाही .व्यापारी महसंघाणे मांडलेल्या दोन्ही गोष्टी संवेदनशील असून पुढील महिन्यात नाथषष्ठी असून त्यापूर्वी आपण यावर त्वरित कारवाही करावी अन्यथा आम्हाला राज्य परिवहन मंडळाच्या विरोधात तिव्र आंदोलन करावे लागेल इशारा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहिया यांनी यावेळी दिला. यावेळी सचिव बलराम लोळगे, उपाध्यक्ष प्रवीण उदावंत, अमोल धस, योगेश लोहिया, लक्ष्मण लबडे, जगदिश लोहिया, अभिषेक करवा आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# वैजापुरात पेंशनर्स डेनिमित्त आयोजित मेळाव्यात विविध मागण्या शासनाकडे सादर




आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राज्यातील जि.प. पेंशनर्स से पेंशन शासकीय कोषागार मार्फत करा, खाजगी शाळा व संस्थेतील निवृत्त कर्मचाऱ्यांची पेंशन जशी शासकीय कोषागारातून होते तसे राज्यातील जि.प. सेवा निवृत्त कर्मचारी पेंशन शासकीय कोषागारातून करा. जि.प. कर्मचारी पेंशन दर महिन्याच्या पांच तारखेच्या आत करा, वेतन आयोगाचे थकीत हप्ते पेंशनर्स ना तात्काळ द्या या मागण्या सह केंद्र सरकारी निवृत्त कर्मचारी यांच्या प्रमाणे दर महिन्याला वैद्यकीय अंशदान राज्य कर्मचाऱ्यांना द्या, ३०जून ला सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सरसकट एक जुलै ची वेतन वाढ न्यायालय निर्णयाला अनुसरून तात्काळ द्या अशा मागण्या मंगळवार( ता,३१ )रोजी पेंशनर्स डे मेळाव्यात जिल्ह्यातील पेंशनर्स नी केली. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष वसंतराव सबनीस होते. तर मुख्य अतिथी जेष्ठ कार्याध्यक्ष पी.डी. शेटे व गंगापूर शाखेचे अध्यक्ष लक्ष्मणराव सदभावे होते. वसंतराव सबनीस व त्यांच्या जिल्हा शाखेच्या वतीने पैठण येथील राज्यस्तरीय पेंशनर्स मेळावा उत्कृष्ट नियोजन पद्धतीने पार पाडल्या बद्धल वैजापूर कार्याध्यक्ष पी. डी. शेटे यांनी सर्वश्री सबनीस, विलास जाधव, पी.टी. कुलकर्णी, नामदेव घुगे,जनार्दन अमृतकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. वसंत सबनीस यांनी आश्वासन दिले की, येत्या तीन महिन्यात सेवानिवृत्त कर्मचारी वर्गाला एक हजार रुपये वैद्यकीय अंशदान मिळवून देऊ तालुक्यातील सर्व सेवा निवृत्त कर्मचार्यानी संघटनेचे सदस्य व्हावे असे आवाहन त्यांनी केले. एस. बी.आय. वैजापूर शाखा बँक मॅनेजर के. कमलेश यांनी ही पेंशनर्स ना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक वैजापूर शाखा अध्यक्ष धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले.

# मॉडेल कॉलेजच्या पदवी परीक्षा सुरळीत सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संचलित मॉडेल कॉलेज घनसावंगीच्या पदवी बीए, बीकॉम, बीएससी ( ऑनर्स ) परीक्षा दिनांक 23 जानेवारीपासून सुरू झालेल्या आहेत. प्राचार्य डॉ. सतीश दांडगे यांनी सांगितले की कॉपीमुक्त वातावरणामध्ये परीक्षा सुरू असून सात फेब्रुवारीपर्यंत या परीक्षा चालतील.७८७ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. प्राचार्य डॉ. सतीश दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा विभाग प्रमुख डॉ. कन्नुलाल विटोरे, सहकेंद्रप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर खोजे, प्रा. उदय पवार, डॉ. भीमराव पुंडगे प्रा. वाल्मीक मेश्राम, श्री. गणेश सुरासे ,श्रीनिमीनाथ मुळे,श्री आकाश कुरुळे आदी परीक्षेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करीत आहेत.



# इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील औराळा फाटा येथील मुन्नाशेठ खंडेलवाल यांच्या पेट्रोल पंपा शेजारी दिनांक ७ फेब्रुवारी मंगळवार रोजी सायंकाळी ५ वाजता संघर्षकन्या माजी जिल्हा परिषद सदस्य संजना ताई जाधव यांच्या वाढदिवसानिमित्ताने समाजप्रबोधन ह भ प निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे याप्रसंगी प्रमुख पाहुणे मंत्री रोजगार योजना व फलोत्पादन महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री संदिपान भुमरे यांची उपस्थिती राहणार आहे असे आवाहन संजना ताई समर्थक शिरोडी चे सरपंच जयेश बोरसे आडगाव चे माजी सरपंच ज्ञानेश्वर निकम यांनी औराळा जेहूर पंचकोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.

# नॅशनल मराठी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि.१/२/२३ रोजी ७४ वा प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने गावातून विद्यार्थी यांची प्रभात फेरी काढून घोषणाबाजी केली यानंतर शाळेत ध्वजारोहण मुख्याध्यापक योगेश चोपडे यांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर स्नेहसंमेलन आयोजन दिनांक १/२/२३ रोजी सकाळी दहा वाजता मुख्यध्यापक योगेश चोपडे यांनी केले.या स्नेहसंमेलन आयोजन करुन विद्यार्थीसाठी कोकरू नृत्य, भारतनाट्यम,कोळीगिते,आदिवासी नृत्य, देशभक्तीपर गीतांवर नृत्य तसेच नाटक, विविध वेशभूषा सादर करत सावळदबारा येथील नॅशनल मराठी शाळेतील विद्यार्थ्यांनी 'जल्लोष' साजरा केला. नॅशनल मराठी विद्यालयात सावळदबारा या शाळेने पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रमांची कास धरली आहे. त्याचाच एक भाग म्हणून दरवर्षीप्रमणे 'जल्लोष' हे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनात प्रत्येक मुलाचा सहभाग कसा राहील, यासाठी व मुख्याध्यापक योगेश चोपडे व शिक्षकांनी प्रयत्न केले.या संमेलनाला विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.विद्यार्थ्यांच्या दर्जेदार कला सादरीकरणाला उपस्थितांनी चांगलीच दाद दिली. नॅशनल मराठी विद्यालयाच्या माध्यमातून दर दोन कार्यक्रमानंतर लकी ड्रॉ काढून भाग्यवंत विद्यार्थ्याला बक्षीस देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी असे कार्यक्रम वारंवार केले जावेत, असी आस मुख्याध्यापक योगेश चोपडे यांनी व्यक्त केली. याप्रसंगी पत्रकार गणेश खैरे, अरुण नप्ते, फकीराभाऊ तडवी,ईशा तडवी,रज्जू तडवी, मुख्याध्यापक योगेश चोपडे, गोतमारे सर, राठोड सर,सागरे सर,विजय चव्हाण, जाधव सर, तडवी मॅडम, योगेश खैरे,शिक्षकवृंद व विद्यार्थी
आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय चव्हाण यांनी केले.



# एसटीच्या स्मार्टकार्डसाठी ३१ मार्चची डेडलाइन

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आदेश;जि.प.गोपीचंद जाधव यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** ६०वर्षावरील ज्येष्ठ नागरिक विविध योजनांतील लाभार्थ्यांना मोफत तसेच ६० वर्षावरील नागरिकांसह रुग्णांना बसेसच्या प्रवास भाड्यात सवलत मिळण्यासाठी स्मार्ट कार्ड आवश्यक आहे. मात्र, कार्ड काढण्यासाठी तांत्रिक अडचणी येत असल्याने शासनाकडून स्मार्ट कार्ड काढण्यासाठी ३१ मार्च पर्यंतची योजनांतील देण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांना एसटी महामंडळाच्या बसचा मोफत प्रवास सवलतीचा प्रवास करण्याची मुभा आहे, त्यांच्याकडे दोन महिन्याचा अवधी असल्याचे समोर आले. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ तर्फे ज्येष्ठ नागरिक, तसेच विविध सामाजिक घटकांना प्रवास प्रवास भाड्यात सवलत देण्यासाठी शासनाने एक जून २०१९ पासून स्मार्ट कार्ड योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेतून ज्येष्ठ नागरिक, विविध सामाजिक पुरस्कार प्राप्त व्यक्ती, विद्यार्थी तसेच रुग्णांना स्मार्ट कार्ड देण्यात येत आहेत. त्यासाठी त्याची अगोदर नोंदणी करुन घेण्यात येत आहेत. महामंडळाने गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी या स्मार्ट कार्ड योजना सुरू केली आहे. त्यानुसार प्रवाशांनी या योजनेचा लाभ घ्यावा, अशे आवाहन जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांनी केले आहे. २९ घटकांना लाभ : महामंडळाच्या बसेसमध्ये जिल्ह्यातील २९ प्रकारच्या समाज घटकांना बसेस शंभर टक्के तसेच २५,५० आणि ७५ टक्के सवलत देण्यात येते. यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, संत गाडगे बाब व्यसनमुक्ती पुरस्कार आणि अन्य पुरस्कार प्राप्त व्यक्तींना व पत्रकार, लोकसभा, विधानसभा प्रतिनिधींना मोफत प्रवास सुविधा आहे. रिजार्च होत नसल्याची अडचण विविध योजनेतून देण्यात येणाऱ्या सवलतीतून अनेकांना स्मार्ट कार्डाचे वितरण करण्यात आले आहेत. त्याचे नुतनीकरणही करण्यात आले आहेत. मात्र त्याचे रिचार्ज करण्यात तांत्रिक अडचण निर्माण झाली. तसेच सर्व्हरची अडचण भेडसावत असल्याने सध्या कार्ड वितरण बंद आहेत. ते लवकरात लवकर सुरू व्हावेत अशी प्रवाशांची अपेक्षा आहे.



सर्व लाभार्थ्यांनी नोंदणी करणे आवश्यक शासनाने ३१ मार्च पर्यंतची डेडलाईन दिली शासनाकडून आतापर्यंत चार वेळा डेडलाईन दिली आहे . त्यानुसार आता ३१ मार्च पर्यंतची डेडलाईन अगोदरच घोषित केली आहे . या काळात सर्वच लाभार्थींनी नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे . त्यानंतर लाभार्थ्यांना मोफत बस प्रवास करण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात . त्यामुळे त्यांनी स्मार्ट कार्ड काढून घेणे आवश्यक आहे .
हिरालाल ठाकरे आगार प्रमुख सोयगाव



# अनाड येथे भागवत कथेची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**संदीप मानकर**

**अजिंठा :** सिल्लोड तालुक्यातील अनाड येथे संगीतमय श्रीमद भागवत कथेची सांगता आज ता.03 रोजी ह.भ.प. व कथा प्रवक्ते नितीनदासजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने मोठ्या उत्साहात संपन्न झाली. गावच्या कर्मभूमीत जन्मलेले ह.भ.प.महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज आणि माजी खासदार उत्तमसिंह पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अनाड गांवी गेल्या 16 वर्षांपासून या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. यावर्षी ह.भ.प.महंत नितीनदासजी महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून गावकऱ्यांनी व भाविकांनी संगीतमय कथेचे श्रवण केले.

गेल्या सात दिवसांपासून सुरु असलेल्या या कथेत रोज रात्री ह.भ.प. नामदेव महाराज पल्हाळ (तोंडापूर), ह.भ.प. शिवाजी महाराज तळेकर (पेरजापूर), ह.भ.प. सोमनाथ महाराज खंबाट (उमरावती), ह.भ.प. शालिग्राम महाराज (भालेगांव), ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज (शेलूद), ह.भ.प. विष्णू महाराज सास्ते (रेणूकाई पिंपळगांव), ह.भ.प. रवींद्र महाराज महाले (नायगव्हाण) आदी महाराजांची कीर्तने झाली. सोबतच दिगंबर तायडे, रामचंद्र लाहूरकर, गजानन जाधव, कैलास गोरे, गणेश खंडाळकर, साहेबराव पाडळे आदींसहित तबलावादक व मृदंगवादक उपस्थित होते. महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांनी या कथेस भेट देऊन प्रवचन केले व 2025 मध्ये होणाऱ्या श्रीमद भागवत कथेसाठी मी स्वतः माझ्या जन्मभूमीत येऊन गाववाशियांना कथा देईल असे जाहीर केले. वरील संगीतमय सोहळा यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी जय गुरुदेव सेवा समिती, अनाड गांवकरी, व ग्रामपंचायत कार्यालय अनाड आदींनी विशेष मेहनत घेतली. तर या कथेस पंचक्रोशीतील सर्वच भाविक भक्तांनी आपला सहभाग नोंदविला.

# कौटुंबिक न्यायालयातील लाचखोर अधीक्षक जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** पोटगी देण्याची मुदत वाढवून देण्याच्या मोबदल्यात शहरातील कौटुंबिक न्यायालयातील सहायक अधीक्षकास अवघ्या दोनशे रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली. तक्रारदारांचा कौटुंबिक वाद शहरातील बी. जे. व्यापारी संकुलातील कौटुंबिक न्यायालयात सुरू होता. तक्रारदाराने त्याची पोटगी देण्याची मुदत वाढवून देण्याची मागणी केली. त्यानुसार कौटुंबिक न्यायालयातील सहायक अधीक्षक हेमंत बडगुजरने दोनशे रुपयांची  मागणी केली होती. त्याअनुषंगाने तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक शशिकांत पाटील यांच्याकडे तक्रार केली. त्याअनुषंगाने सापळा रचण्यात आला. त्यानुसार पथकाने बी. जे. व्यापारी संकुल परिसरात गोविंदा कॅन्टीनमध्ये सहायक अधीक्षक बुडगुजर यास दोनशे रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताच रंगेहात पकडले. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोणत्याही शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी किंवा त्यांच्या वतीने खासगी व्यक्तीने त्यांचे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक पाटील यांनी केले आहे.

# समाजसेविका पूजा सुमित पंडित यांना सावित्रीबाई फुले समाजरत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** समाजसेविका पूजा सुमित पंडित यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत ते करीत असलेल्या रजंल्या गांजल्याची सेवा खरंच समाजापुढे वाखाडण्याजोगी आहे,रस्तावर फिरणाऱ्या मनोरुग्णाची दाढीकरुन देऊन, केस कापून स्वच्छ अंघोळ घालुन त्यांना मनोविकृती रुग्णालयात दाखल करतात,गरजू रुग्णांना अर्धा रात्री मेडिकल साहित्य, भोजन, रक्त, पुरविण्यात ही जोडी देवदुतासारखी मदतीला धावून जाते, बेवारसांचे अत्यंविधी सुध्दा हे दांपत्य माणुसकी समुहाच्या माध्यमातून करतात, पुजा सध्या माणुसकी वृध्दाश्रम चालवतात त्यांचे औरंगाबाद येथे माणुसकी वृध्द सेवालय देखील वृध्दाच्या सेवेसाठी मदतकार्य करते, व शासकीय रुग्णालयात रात्री येणाऱ्या गरजू रुग्णांना दररोज भोजनव्यवस्था पुजा ह्याच  करतात. त्यामुळेच  त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत, सन्मानित करण्यात येणार आहे, सर्व माननिय सत्कार मुर्ती नां कळवण्यात आनंद होत आहे. संत तुकाराम महाराज युवा फांऊडेशन यांच्या ७ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे,ह्या कार्यक्रमाला संत तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ.प.अशोक महाराज मोरे व उद्योजक श्रीराम पाटील व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

हा सोहळा पंचायत समिती सभागृह भुसावळ येथे दिनांक.०३-०२-२०२३ रोजी आयोजित  करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे आयोजक.

संस्थापक अध्यक्ष छबिलदास पाटील,यांनी पुरस्कार जाहीर झाल्याचे संत तुकाराम  महाराज फाँऊडेशन निवड समितीतर्फे पत्राद्वारे कळविले आहे.या आधी पुजा यांना विविध २५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ह्या पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल  समाजात पुजा पंडित यांचे  सर्वत्र कौतुक होत आहे.

# राष्ट्रवादी उद्योग विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या आणखी एका उद्योगात भर

## न्यू हॉलंड ट्रॅक्टरची अधिकृत मिळाली डीलरशिप



आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेशदादा फाटे यांच्या एन पी ग्रुप उद्योग समुहामधे आणखी एका मोठ्या उद्योगाची भर पडली आहे. यामध्ये न्यू हॉलंड ट्रॅक्टरची अधिकृत मिळाली डीलरशिप मिळाली असून या उद्योग समुहासाठी पंढरपूर, मंगळवेढा आणि सांगोला तालुक्यातील ट्रॅक्टर विक्रीसाठी विक्रीला परवानगी मिळाली आहे.

CNH INDUSTRIAL संचलित NEW HOLLAND फाटे ट्रॅक्टर्स पंढरपूर, मंगळवेढा व सांगोला अशी अधिकृत डिलरशिपचे अथोराईजचे पत्र उत्तर प्रदेश येथील नोएडा येथील प्लांट मध्ये CNHI चे ALL INDIA HEAD गगण पाल यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी सेल रिजनेल मॅनेजर सुशिल पटेल, सर्व्हिस रिजनेल मॅनेजर परेश प्रधान, डिलर डेव्हलपमेंट हेंड अमोल कापसे, एरिया मॅनेजर दत्ता कोल्हे, टेरिटरी मॅनेजर विजय चोव्हाण,श्री.नागेश दादा फाटे, डॉ.रमेश फाटे,श्री. उमेश फाटे, चि. शुभम फाटे उपस्थित होते. सेल्स, सर्व्हिस व स्पेअर अशी अधिकृत डिलरशिप आपल्या सर्वांच्या सहकार्याने लवकर आपल्या सेवेत येत आहेत. यामुळे फाटे उद्योग समूहातील उद्योग वाढत असल्याचे दिसत आहे. यामुळे अनेक तरुणाच्या हाताला काम मिळत असल्याचे दिसत आहे.

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ३४ कोटी ३१ लाख निधी मंजूर

## आ. समाधान आवताडे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

ज्योती खिलारे

**पंढरपूर :** पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील रस्त्यांसाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा - २ अंतर्गत मतदारसंघातील रस्त्यांच्या दर्जा उन्नतीसाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे - पाटील यांच्या माध्यमातून ३४ कोटी ३१ लाख रुपये मंजूर झाले आहेत



अशी माहिती पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे.

पंढरपूर तालुक्यातील कासेगाव ते घायाळ वस्ती या मार्गावरील रस्त्याच्या रुंदीकरण व दर्जा सुधारणा करण्यासाठी ३ कोटी कोटी ५२ लाख रुपये, तसेच रामा १४३(फूट रस्ता)ते गादेगाव रस्त्याच्या सुधारणेसाठी ४ कोटी ६५ लाख इतका निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर मंगळवेढा तालुक्यातील आंधळगाव शेलेवाडी,आसबेवाडी ते मारापूर या रस्त्यासाठी ९ कोटी ४४ लाख, दामाजी कारखाना चौक ते ब्रह्मपुरी ८ कोटी ३ लाख, मंगळवेढा ते मुंढेवाडी व ते तामदर्डी तांडोर ८ कोटी ४ लाख रुपये असा निधी मंजूर झाला आहे.

आ. आवताडे यांच्या अथक प्रयत्नांतून यापूर्वीही राज्य शासनाच्या विविध विकासाभिमुख योजनांतून पंढरपूर - मंगळवेढा तालुक्यातील विविध रस्ते सुधारणा आणि बांधणीसाठी भरघोस निधी प्राप्त झाला आहे. मतदारसंघाच्या धोरणात्मक प्रगतीसाठी आणि पायाभूत विकासासाठी केंद्रस्थानी असणाऱ्या रस्ते विकासासाठी आ. आवताडे हे नेहमीच प्रयत्नशील असतात. आ. आवताडे यांच्या रस्ते विकास अनुषंगाने विकासाभिमुख दूरदृष्टीतील कार्यात्मक भूमिकेमुळे सध्या वाहतूक रहदारीसाठी येत असलेले अडथळे दूर होण्यास मोठी मदत होणार आहे. पंढरपूर व मंगळवेढा विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावाचा समतोल विकास व्हावा यासाठी आ. आवताडे यांनी राज्य शासनाकडे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. आ. आवताडे यांच्या या मागणीवरून मुख्यमंत्री ग्रामसडक योजना निधीतून सदर निधी मंजूर झाला आहे.

> अन्न वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत . परंतु अलीकडच्या आधुनिक काळामध्ये वाढता संपर्क व दळणवळणाच्या सुविधा या बाबी लक्षात घेता सुव्यवस्थित व दर्जेदार रस्ते बांधणी ही काळाची गरज बनली आहे . मतदार संघातील जनतेच्या या भौतिक सुविधांचा विचार करून आमदार समाधान आवताडे हे नेहमीच सहकार्य कौशल्याने आपली जबाबदारी व कर्तव्य पार पाडत असतात . आमदार अवताडे यांची ही विकासदृष्टी पंढरपूर व मंगळवेढा मतदार संघाचा चेहरा – मोहरा बदलण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शेतकरी व विद्यार्थी यांना नियोजन जागी पोहोचण्यासाठी खूप महत्त्वपूर्ण ठरणार आहे – मोहन आप्पा बागल

पंढरपूर व मंगळवेढा विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावाचा समतोल आणि व्यापक पद्धतीने विकास व्हावा याकडे आपले वैयक्तिक लक्ष असून यासाठी निधीची कोणतीही कमतरता पडू देणार आहे. मतदारसंघातील नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास ठेवला तो मी माझ्या कामातून सार्थ ठरविणार आहे. येत्या काळात केंद्र व राज्य शासनामार्फत उर्वरित रस्ते कामांसाठी लागणाऱ्या निधीसाठी पाठपुरावा सुरूच राहणार आहे. आ. आवताडे यांच्या विकास दृष्टीमुळे शासनाकडून एवढा भरीव आणि मोठ्याप्रमाणातील निधी पहिल्यांदाच पंढरपूर मंगळवेढा तालुक्यातील विकास कामांना मिळाल्याची भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

# ऋता प्रियांका अनुप ढम हिची वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सर्वात लहान वयात अनेक गोष्टी करणारी मल्टी टॅलेंटेड मुलगी म्हणून ऋता प्रियांका अनुप ढम हिची नोंद झाली आहे.



ऋताचा जन्म झालाय तो उडण्यासाठी जिने जन्माला आल्या आल्या "घे" हा शब्द उच्चारला, जन्माला आल्यानंतरच काय अगदी ती पोटात असल्यापासूनच तिला काय हवं नको हे ती तिच्या हालचालींद्वारे सांगत होती. कुठलही एखादं गाणं आवडलं की त्याच्यावरती आत मधून सुद्धा तिचा उत्साह आणि गाण्याबरोबर ती तिचे हातपाय हलवून दाद द्यायची . कट्यार काळजात घुसली मधील सुर निरागस हो हे गाणं तर तिने जन्माच्या तिसऱ्या दिवशी अगदी शांतपणे ऐकलं होतं तेव्हा आम्ही पण आश्चर्यचकित झालो होतो. अगदी दोन-तीन महिन्यांची होत नाही तोपर्यंत तिच्या आजोबांच्या मागे" गुड मॉर्निंग "हा शब्द उच्चारायचा प्रयत्न करत होती ती नक्कीच काहीतरी विलक्षण असणार हे तिच्या आईने ओळखले होते व त्यामुळे तिच्या आईने ठरवले हिला आपण लवकरच बोलते करायचे. मी जिचा उल्लेख इथे केला आहे तिचे नाव आहे ऋता. तिचा जन्म सातारा येथे झाला पण सध्या ती राहते पुणे येथील लोणी काळभोर या ठिकाणी तिची पूर्ण नाव आहे ऋता प्रियांका अनुप  ढम. तिने एक वर्ष पूर्ण करायच्या आतच ए टू झेड, वन टू टेन, हे सर्व आकडे आत्मसात केले आणि ते बोलायचं देखील ती प्रयत्न करू लागली, दीड ते दोन वर्षाच्या आत तिच्या जवळ जवळ सहा ते सात कविता पाठ आहेत. आणि ती त्या कविता एकटी म्हणते. शिवाय 'शुभम करोति', लक्ष्मी स्तोत्र, म्हणते  नक्कल करणे, व्हेजीटेबल्स, फ्रुट्स, एनिमल्सची नावे हे सर्व ती अचूक ओळखते आणि ही सर्व किमया  तिने दोन वर्षाच्या आतच दाखवलेली आहे. असे तिच्या आईने सांगितले. तसेच डान्स करणे हा तिचा आवडता छंद आहे. असेही सांगितले एखादे गाणे लागले की ती डान्स करते, तसेच तिच्या आजीबरोबर योगाही करते, तिच्या बाबांबरोबर गाण्याचा रियाज करते, तिचे दोन भाऊ शिवम व सोहम यांच्याबरोबर फोनवर व्हिडिओ कॉलवर बोलायला तिला आवडते. अर्थात तिला हे सर्व काही येत नसेलही पण तिच्या प्रयत्नांना तिच्या बुद्धीला आणि तिच्या चातुर्याला नक्कीच दाद द्यावी लागेल आणि म्हणावे लागेल असेच अजून खूप विक्रम कर आणि उंच भरारी घे व आपल्या महाराष्ट्राचा देशाचा नावलौकिक क्षितिजाच्या  पलीकडे जाऊ दे. या तिच्या विक्रमाची सर्वत्र प्रशंसा होत आहे व तिच्या आई, वडिलांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. तिच्या पुढच्या वाटचालीस शुभेच्छा.



# समृद्धी ट्रॅक्टर येथे लकी ड्रॉ उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला तालुक्यातील आघाडीचे ट्रॅक्टर विक्री शोरुम समृध्दी ट्रॅक्टर्स आपल्या अभिनव उपक्रमांमुळे सातत्याने चर्चेत असते. यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने समृध्दी ट्रॅक्टर्सकडून 'सोनालीका ट्रॅक्टर खरेदी करा आणि सोने जिंका' ही लकी ड्रॉ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात चिठ्ठ्या टाकून विजेते स्पर्धक निवडले जातील असे ठरविण्यात आले होते. विजेत्या शेतकऱ्यांना ५ ग्रॅम, ३ ग्रॅम, २ ग्रॅम असे सोने बक्षीस म्हणून देण्यात येईल असे घोषित करण्यात आले होते.

आपल्या कृषीप्रधान देशात जय जवान जय किसान असा नारा देत श्री विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष श्री अभिजीत आबा पाटील यांनी शेतकरी बांधवांना ट्रॅक्टर खरेदीवर सोने जिंकण्याची संधी समृध्दी ट्रॅक्टर्सच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून दिली आहे.

या लकी ड्रॉचा निकाल जाहीर झाला असून सांगोला तालुक्यातील हंगिर्गे गावातील विकास सदाशिव सावंत यांनी ५ ग्रॅम, सांगोला तालुक्यातील सावे येथील  शिवाजी अशोक कुंभार यांनी ३ ग्रॅम, तर बीड येथील चोसला गावातील अण्णासाहेब दिनकर नायगुडे यांनी २ ग्रॅम सोने जिंकले आहे. सर्व विजेत्या शेतकऱ्यांचे समृध्दी ट्रॅक्टर्सच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

आता पुन्हा एकदा समृध्दी ट्रॅक्टर्सच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ट्रॅक्टर खरेदीसाठी १ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी या कालावधीत लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत समृध्दी ट्रॅक्टर्स येथे ट्रॅक्टर खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांना सोने जिंकण्याची सुवर्णसंधी प्राप्त होणार आहे. अधिकाधिक प्रमाणात शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन समृध्दी ट्रॅक्टर्सकडून करण्यात आले आहे.

यावेळी कार्यक्रमासाठी संचालक अभिजीत कदम, अच्युत मलपे, पोरेदादा, मॅनेजर सोमनाथ केसकर, सर्व शेतकरी बांधव आणि कर्मचारी उपस्थित होते.

# विविध मागण्यांसाठी भूमिपुत्रांची तहसील कार्यालयावर धडक



आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा. :** यावर्षी बुलढाणा जिल्ह्यात प्रचंड अतिवृष्टी होऊन प्रंचड पाऊस पडला त्यामुळे शेतकऱ्याच्या काही पिकाचे नुकसान झाले पिकाची नुकसान होऊन सुद्धा एक रुपयाची फुटकी मदत शासनाने शेतकऱ्याला दिली नाही. ती मदत शेतकऱ्याला तात्काळ मिळायला पाहिजेत.
तसेच सोयाबीन-कापसाचे भाव हे कमी झाल्याने शेतकर वर्ग हा चिंतेमध्ये पडलेला आहे. त्यामुळे सोयाबीन कापसामध्ये दरवाढ करून शेतकऱ्यांना आधार द्यावा.
त्यानंतर खराब झालेल्या सोयाबीन-कापूस तसेच इतर पिकाचा पिक विमा शेतकऱ्यांना देण्यास पिक विमा कंपन्या टाळाटाळ करत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण तयार झालेले आहे कुठतरी पिक विमा कंपनीने खराब झालेल्या पिकाची नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्यक करावे. गेल्या काही दिवसानंतर संपूर्ण जगभरामध्ये गुराढोरांवर लंम्पी आजाराचा प्रादुर्भाव झाला होता. या आजारामुळे अनेक शेतकऱ्यांची जनावरे मरण पावली या मरण पावलेल्या जनावरांचे आर्थिक सहाय्य मिळावे याकरता शेतकऱ्यांनी संबंधित विभागाकडे डॉक्युमेंट जमा केलेले आहेत परंतु शेतकऱ्यांना दगावलेल्या जनावरांची आजपर्यंत ही आर्थिक मदत मिळालेली नाही ही मदत शेतकऱ्यांना द्यावी.
आणि विशेष म्हणजे जळगाव जामोद तालुक्यातील आसगाव बाजार समितीमध्ये शेतकरी आपला शेतमाल विकायला आणत असतात व्यापारी हे शेतकऱ्यांना मालाची कॅश रक्कम न देता चेक स्वरूपात अदा करतात ज्यावेळेस शेतकरी बँकांमध्ये चेक जमा करायला जातात त्यावेळेस काही बँका ह्या शेतकऱ्याची मागील रक्कम कपात करतात त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होत आहे. या बँका जर शेतकऱ्यांना न विचारता रक्कम कपात करत असतील तर अशा बँकांवर कारवाई व्हायला करा.
या सर्व मागण्या घेऊन युवा आंदोलक अक्षय पाटील यांनी तहसील कार्यालय गाठत नायब तहसीलदार त्यांच्याशी चर्चा केली. वरील सर्व मागण्या शेतकऱ्यांच्या हक्काच्या असुन ह्या मागण्या मान्य न झाल्यास आठ दिवसामध्ये आंदोलन करण्यात येईल असा इशारा नायब तहसीलदार मार्तंड साहेब यांना अक्षय पाटील यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला. यावेळी अशपाक देशमुख, अजय गिरी, सोपान पाटील, अमीत भिवटे, गुड्डु मिस्तरी, ऋषिकेश वंडाळे, योगेश ताडे, उल्हास माहोदे तसेच तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी बांधव उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in